CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

7.2

वाराणसी-5

श्री

(हिंदुस्थानी संगीत पद्धति)

क्रमिक पुस्तकमालिका.

सहावें पुस्तक

प्रकाशक व सहसंपादक
चन्द्र सीताराम सुकथनकर, एम्.ए., एल्एल्.बी.,
सॉलिसिटर, मुंबई.

आवृत्ति पहिली

सन १९३७.

किंमत रु. ४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0: In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आ: ३/७४
आम्नाय–ग्रन्थालय,
भरतनिधि, कराँची
भारतपती-5

प्रस्तावना

क्रमिक पुस्तक मालिकेच्या पांचव्या पुस्तकांत एकंदर दहा थाटांपैकीं पहिल्या पांच थाटांतील ६८ अप्रसिद्ध राग, व त्यांतील कै. विष्णु नारायण भातखंडे यांनीं ठिकठिकाणीं फिरून गोळा केलेल्या २५५ खानदानी चिजा दिल्या गेल्या. राहिलेल्या पांच थाटांतील ६८ अप्रसिद्ध राग व त्यांतील २३७ खानदानी चिजा या पुस्तकांत दिल्या जात आहेत. याप्रमाणें ग्रंथकारांनीं मालिकेच्या पहिल्या चार पुस्तकांत, प्रसिद्ध ४५ रागांत प्रसिद्ध केलेल्या सरासरी सव्वा तेराशें चिजा, व त्यांच्या निधनानंतर मालिकेच्या पांचव्या व या सहाव्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या अप्रसिद्ध १३६ रागांतील सरासरी पांचशें चिजा, मिळून जवळजवळ अठराशें अमूल्य चिजांचा सांठा जनतेच्या स्वाधीन आदरपूर्वक केला आहे. " अखिल भारत संगीत परिषदांत " ज्या मल्लार, सारंग व तोडी प्रकारांचीं रागस्वरूपें बहुमतांनीं निश्चित केलीं गेलीं, ते सर्व प्रकार या सहाव्या पुस्तकांत ग्रथित झाले आहेत.

परमपूज्य गुरुवर्यांनीं आपल्या हयातींत माझ्यावर टाकिलेली ही अत्यंत महत्वाची कामगिरी अशा तऱ्हेनीं पुरी होत असल्यामुळें मला आनंद होत आहे. "हिंदुस्थानी संगीत पद्धति" रूपी जो आधुनिक "संगीत रत्नाकर" कै० गुरुवर्यांनीं या अवनितलावर आणिला, त्याचें मंथन करून, आटोपशीर, शाळा व कॉलेजांत सहज शिकवितां येण्याजोगें ७००–८०० पानांचें सार तयार करण्याकडे मला आतां एकाग्रतेनें वळतां येईल; व तें सार या देशांत प्रचलित असलेल्या मुख्य भाषांत भाषांतरित करून फैलावलें म्हणजे मी कृतकृत्य होईन. कार्यबाहुल्यामुळें हें काम जरी मला जितक्या झपाट्यानें पुरें करावयाला हवें आहे, तितकें करितां आलें नाहीं, तरी त्यांच्या उज्ज्वल चारित्र्य-स्फूर्तीनें हें काम मी तडीस नेईन अशी मला उमेद आहे;

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व माझ्या हातांनीं तें त्यांनीं पुरें करवून घ्यावें अशी त्यांच्या चरणांपाशीं माझी प्रार्थना आहे.

संपादकद्वयांनीं चिजांच्या आधीं दिलेलीं रागांचीं स्वरूपें, चलन, उठाव वगैरे, व सुरवातीची प्रस्तावना व शेवटीं दिलेले स्वर-विस्तार अत्यंत परिश्रम-पूर्वक तयार केले आहेत. जवळ जवळ असलेलीं राग-स्वरूपें, स्वरूप-वर्णनांत व स्वर-विस्तारांत भिन्न ठेवून दाखविणें हें किती कौशल्याचें काम आहे, हें तें करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय समजणार नाहीं. अगदीं सारखीं भासणारीं राग-स्वरूपें विशिष्ट स्वर-विन्यासांमुळें, किंवा वादी-भेदानें, किंवा इतर तऱ्हेनें निराळीं ठेविणें, याचेंच नांव 'पद्धति'; व ही पद्धति रोमांरोमांत भिनलेली असल्या शिवाय तें कार्य होणार नाहीं. वर्षानुवर्षें कै० गुरुवर्यांच्या सान्निध्यांत घालविल्यामुळें, संपादकद्वयांनीं हें काम चोख पार पाडलें, यांत नवल नाहीं; व त्याबद्दल त्यांचा गौरव करावा तेवढा थोडाच आहे. सुरवातीस प्रस्तावनेंत दिलेली माहिती फारच उपयुक्त आहे, व तिचा वाचक विचार करून, **पद्धतशीर** गायनवादनाकडे लक्ष लावतील अशी उमेद आहे.

पूर्वीं "गीतमालिका" या नांवानें ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत आलेल्या बहुतेक चिजा क्रमिक पुस्तक मालिकेच्या निरनिराळ्या भागांत समाविष्ट केल्या आहेत; त्यामुळें त्या चिजा "गीतमालिका" या रूपानें छापण्याची आवश्यकता राहिली नाहीं. क्रमिक पुस्तक मालिकेच्या सहाही भागांत छापल्या गेलेल्या सरासरी अठराशें चिजांची रागानुक्रमानें व वर्णानुक्रमानें एक सूची मी आतां तयार करीत आहें. तिच्यामुळें अमुक एक चीज कोणत्या रागांत आहे व क्रमिक पुस्तक मालिकेच्या कोठल्या भागांत कोठल्या पानांवर आहे, हें वाचकांस ताबडतोब मिळेल व अभ्यास तेवढा सोपा होईल.

कै. गुरुवर्यांनीं संगीतामृत घरोघरीं पोहोंचतें करण्यासाठीं अत्यंत परिश्रम करून, गेल्या वीस पंचवीस वर्षांत जे प्रयत्न केले, त्यांचीं फळें हळु हळु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देशभर दिसत आहेत. एके काळीं संगीताविषयीं जें औदासिन्य होतें, तें अनिष्ट धुक्यासारखें देशावरून उडून जात चाललें आहे; व गीतानंदाचा प्रकाश चहूंकडे फैलावत जाऊन, जिकडे तिकडे संगीताविषयीं अत्यंत उत्साह व आनंद दृग्गोचर होत आहे. शहरोशहरीं, सालानुसाल संगीत परिषद होत असून, मुलांमुलींच्या तोंडीं देखील खानदानी चिजा ऐकूं येत आहेत; यामुळें त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यास अवर्णनीय आनंद होत असेल यांत संशय नाहीं; व याप्रमाणें संगीत—देवालयाचा केला गेलेला जीर्णोद्धार चिरस्थायी करण्याची जबाबदारी अर्थात या व पुढील पिढ्यांवर आहे. त्यांचा मुख्य बाणा शास्त्रशुद्ध गायनवादन हाच होता. प्रत्येक रागस्वरूपाचें सूक्ष्म व मार्मिक परिक्षण करून, त्यांनीं आपल्या "हिंदुस्थानी संगीत पद्धति" ग्रंथांत, कसलेल्या रसायनशास्त्र्यासारखें पृथक्करण करून दाखविलें आहे. जिज्ञासु व रसिक वाचकांनी तीं वर्णनें अवश्य वाचून, मनन करून, आत्मसात् करावी, व त्याच ढंगानें आपलें गायनवादन शास्त्रशुद्ध ठेवावें असा प्रेमपूर्वक आग्रह आहे. नुसतें गळा फ़िरेल तशा तानांच्या लकेऱ्या फेकण्यांत कौशल्य नसतें; पण त्याच तानेस शास्त्रशुद्ध वळण दिलें तर ती अवर्णनीय आनंद उत्पन्न करूं शकते. आपण आपल्या गायनवादनानें श्रोत्यांची अभिरुची वळवीत असतों, ही गोष्ट कलावंतानें विसरून चालणार नाहीं; व श्रोत्यांची रुची भ्रष्ट करणें, हें शास्त्रदृष्ट्या अश्लाघ्य आहे. मनुष्याच्या अनियंत्रित हातवाऱ्यांत, आणि नर्तकाच्या वळणदार अंगविक्षेपांत किती फरक असतो हें कोणालाही समजेल. याच कारणास्तव प्रत्येक विद्यार्थ्यानें, अत्यंत मेहनत करून गळ्यावर किंवा वाद्यावर पूर्ण काबू मिळविला पाहिजे; व शुद्ध रागस्वरूप कायम नजरेपुढें ठेवून, या मूर्तीचा किंवा त्या रसाचा भंग होऊं न देतां आपलें गायनवादन केलें पाहिजे. याचा अर्थ असा नाहीं कीं, कोणी नवीन रागस्वरूपनिर्मितीला पायबंद घालत आहे. तशी निर्मिती जबाबदार कलावंतांनीं राग-नियमांकडे व गीत-नियमांकडे लक्ष लावून केल्यास, तें संगीत परिवर्तन दृष्ट्या, इष्टच आहे. पण अशी रागरचना चालेल तों ग्रंथाधारानेंच व्हावी.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हीं दोन्हीं पुस्तकें मुंबई वैभव छापखान्याचे चालक रा. रा. भास्करराव सिद्धये यांनीं अल्पावधींत व परिश्रमपूर्वक छापून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

कै. गुरुवर्यांनां दिवंगत होऊन नुकतेंच एक वर्ष पुरें झालें. येवढ्यांत त्यांचीं हीं शेवटचीं दोन्ही पुस्तकें छापून निघालीं, म्हणून मला आनंद होत आहे. दयाघन परमेश्वरानें त्यांची आयुर्मर्यादा थोडीशी वाढवून, हीं दोन्हीं पुस्तकें त्यांनां या मृत्युलोकींच दाखविलीं असतीं, तर माझ्या आनंदांत कल्पनातीत भर पडली असती. परंतु भवितव्यतेपुढें सर्वांनीं मान लवविलीच पाहिजे.

येवढी प्रस्तावना करून, हा ग्रंथ मी आज बलिप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर जनताकरकमलीं ठेवून, वाचकांची रजा घेतों.

शांताराम हाउस, वाळकेश्वर, मुंबई
२ नोव्हेंबर १९३७, बलिप्रतिपदा,
कार्तिक शुद्ध १ शके १८५९

भालचंद्र सि. सुकथनकर
प्रकाशक व सह-संपादक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ग्रंथकार : पंडित विष्णु नारायण भातखंडे, बी. ए., एल्एल्. बी.

(" चतुर पंडित ")

जन्म : गोकुलाष्टमी शके १७८२
ता. १० ऑगष्ट १८६०

मृत्यु : गणेशचतुर्थी शके १८५८
ता. १९ सप्टेंबर १९३६

" मद्भक्ता : यत्र गायंते तत्र तिष्ठामि नारद "

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

वस्तुसंग्रह.

	पृष्ठ
नाम–पृष्ठ (टायटल् पेज)	१
प्रस्तावना	३ ते ६
ग्रंथकाराचें छायाचित्र	६ समोर
वस्तुसंग्रह	७ ते ८
शिक्षकांस सूचना	९
पुस्तकांत आलेल्या चिन्हांचा खुलासा	१०
क्रमिक पुस्तकांतील तालांच्या मात्रा व बोल	११ ते १३
पुस्तकांत आलेल्या रागांची अनुक्रमणिका	१५ ते १६
शास्त्रीय माहिती	
मंगलाचरण	१
विषय प्रवेश	२ ते ३
प्राचीन व मध्यकालीन संगीतांत होत जाणारा फरक	४
गेल्या शेंदोनशें वर्षांतील प्राकृत व उर्दु संगीत ग्रंथ	४
मध्यकालांतील राग वर्गीकरणें	५
आजकालचा श्रुति-स्वरवाद	५ ते ७
रागाची व्याख्या व तींतील " स्वर ", व " वर्ण " या शब्दांचें महत्व " जाति " हें निबद्धगान असावें	७
रागालाप	७
वादि-संवादि	८
राग गायन म्हणजे काय?	८
आवाजाची कसरत, व तानालाप	९ ते १०
रागदारी संगीताचा परिणाम सर्वसाधारण श्रोत्यांवर व्हावा तसा होत नाहीं याचीं कारणें	१० ते ११
संगीतांत शब्दांचें महत्व	१२ ते १३
संगीताचें मराठीकरण	१३ ते १५
अभिरुचि	१५ ते १७
आजकालच्या परिस्थितिचा मैफलीवर परिणाम	१७ ते १८
संगीत विद्यार्थ्यांची प्रगति	१८ ते १९

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग व रस ... ... १९ ते २२
रागदारींत संसारिक जीवनाचें दिग्दर्शन २२
संगीत व्यवसायी लोकांचे वर्ग ... ... २२ ते २३
वाग्गेयकार २३
कलावन्त २३
संगीतशिक्षक ... ... २४ ते २६
संगीतशास्त्रकार २६
आवाजाच्या धर्माला अनुसरून विद्यार्थ्यांचे वर्ग ... ... २७ ते २९
संगीत संस्था ... ... २९ ते ३०

चीजांचा संग्रह

मारवा थाटांतील अप्रसिद्ध रागांतील चीजा (३६) ... १ ते ६७
काफी „ „ „ „ (१३५) ६९ ते २९४; व ४१४ ते ४१५
आसावरी थाटांतील अप्रसिद्ध रागांतील चीजा (५०) २९६ ते ३७८
भैरवी „ „ „ „ (९) ... ३८० ते ३९७
तोडी „ „ „ „ (७) ४०० ते ४१३
पुस्तकांत आलेल्या रागांचे स्वर-विस्तार १ ते ७०
चीजांची रागानुक्रमानें सूची ... ... १ ते ६
चीजांची वर्णानुक्रमानें सूची ७ ते १२
शुद्धिपत्र १३ ते १७

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिक्षकांस सूचना.

१ हवा तो ध्वनि षड्ज कल्पून विद्यार्थ्यांस त्या स्वरांत येऊन मिळण्यास प्रथम शिकवावें. प्रत्येक वेळीं सा स्वर शिक्षकानें मोठ्यानें व सावकाश असा म्हणावा. असें वारंवार रोज करीत जावें.

२ विद्यार्थ्यांस आपणाबरोबर स्वर म्हणूं देऊं नये. त्यांनीं ते ऐकूनच म्हणावे.

३ विद्यार्थ्यांस चोरटा आवाज लावूं देऊं नये.

४ एका वेळीं तिहींपेक्षां अधिक विद्यार्थ्यांना स्वर म्हणूं देऊं नये.

५ स्वर शिकवितांना फळ्याचा उपयोग पहिल्यापासूनच करूं लागावें व विद्यार्थ्यांस स्वर वाचण्याची संवय करवावी.

६ विद्यार्थ्यांच्या स्वरस्थानांकडे, श्वासोच्छ्वासाकडे व त्यांना होणाऱ्या श्रमाकडे लक्ष असूं द्यावें.

७ सरगमीं शिकवूं लागण्यापूर्वीं वारंवार केलेल्या अभ्यासानें विद्यार्थ्यांस स्वरओळख बरीच झालेली असावी. सरगमीच्यामुळें मुख्यतः रागज्ञान होतें, म्हणून त्या नीट म्हणवून घेण्याची खबरदारी घ्यावी.

८ स्वर शिकवूं लागण्यापूर्वीं ताल व त्यांच्या मात्रा प्रथम विद्यार्थ्यांस शिकविणें बरें. निदान **सरगमी** शिकविण्यापूर्वीं विद्यार्थ्यांस तालमात्रांचें उत्तम ज्ञान झालेलें असावें.

९ चिजांचें बोल शिकविण्यापूर्वीं प्रत्येक ओळ **स्वरांनीं** तेथल्या अलंकारांसह म्हणतां यावी.

१० शुद्ध स्वरांचे धडे चांगले वाचतां आल्यावर विकृत स्वराभ्यासाकडे वळावें. विकृत स्वर बहुधा अर्धांतरें असल्यामुळें, ते शिकवितांना **गम** व **निसा** या विद्यार्थ्यांच्या तयार झालेल्या अर्धांतराचा उपयोग करावा. जसें **मंप** या स्वरांना मधूनमधून **निसा** म्हणवावें. विकृत स्वर केव्हां व कसे शिकवावयाचे, हें शिक्षकाच्या दूरदृष्टीवर व हुषारीवरच अवलंबून राहील.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या पुस्तकांत योजिलेल्या चिन्हांचा खुलासा

रे, ग, ध, नि, या स्वरांच्या खालीं आडवी रेघ असली, तर ते कोमल आहेत असा समजावें; तशी नसली तर तीव्र समजावें.

म असा लिहिलेला, शुद्ध अथवा कोमल समजावा.

मं असा लिहिलेला, तीव्र समजावा.

• ज्या स्वरांच्या खालीं बिंदु असेल ते **मंद्र** स्थानचे, व ज्यांच्या माथ्यावर बिंदु असेल ते **तार** स्थानचे समजावे.

बिंदूशिवायचे सारे स्वर **मध्य** सप्तकाचे समजावे.

◡ अशा चिन्हांत लिहिलेले स्वर एका मात्रेच्या कालांत गावयाचे आहेत.

⌒ हें चिन्ह कोणत्या स्वरापासून कोणत्या स्वरापर्यंत **मींड** (एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर घर्षणानें जाणें) आहे, हें दाखवितें.

– स्वरापुढें हें चिन्ह असेल, तेथें तो स्वर एक मात्रा लांबवावयाचा आहे. अथवा चिन्हच नसेल तर तितकी विश्रांति आहे असें समजावें.

ऽ गीताच्या शब्दांत जेथें हें अवग्रह चिन्ह असेल, तेथें मागच्या अक्षरांतला अंत्य स्वर (अकार, उकार इ.) एक मात्रा लांबवावा.

( ) स्वराला असा कंस केला असेल, तर त्याच्या पुढचा स्वर, तो स्वर, त्याच्या मागचा स्वर, व पुनः तो स्वर, असे चार स्वर एका मात्रेंत म्हणावे; जसें:—(प)=धपमप; (म)=पमगम; (सा)=रेसानिसा.

कोठें कोठें स्वरांच्यावर डाव्या बाजूला लहान टाइपानें छापलेले स्वर आहेत, त्यांस (**'ग्रेस नोट'**) अलंकारिक स्वर म्हणतात. हे बारीक **कण** नवीन विद्यार्थ्यांस गळ्यानें म्हणतां न आले, तरी त्यांच्या अभावीं रागहानि होणार नाहीं. ते लावतां आल्यानें गायन अधिक रंजक होईल.

× हें चिन्ह गायनाच्या तालाची **सम** दाखवितें. **सम** हा पहिला ठोका मानून पुढील ठोके त्याच्या धोरणानें समजावेत.

० हें चिन्ह तालाची **खाली** म्हणजे रिकामी जागा दाखवितें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

क्रमिक पुस्तकांत आलेल्या तालांचे मात्रानियम व बोल

—:o:—

ताल दादरा

मात्रा—	१	२	३	४	५	६	
ठेका—	धीं	धीं	धा	धा	ती	ना	तबला.
"	धीं	तीं	धा	"	"	"	"
	×			०			

ताल तीव्रा

मात्रा—	१	२	३	४	५	६	७	
थपिया—	धा	दीं	ता	तिट	कत	गदि	गन	पखवाज.
	×			२		३		

झपताल

मात्रा—	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	
थपिया—	धा	ऽ	धा	गी	की	ट	कड	धा	की	ट	पखवाज.
ठेका—	धी	ना	धी	धी	ना	ती	ना	धी	धी	ना	तबला.
	×		२			०		३			

सूलताल

मात्रा—	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	
थपियां—	धा	धा	दीं	ता	किट	धा	तिट	कत	गदि	गन	पखवाज.
	×		०		२		३		०		

चौताल

मात्रा—	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	
थपिया—	धा	धा	दीं	ता	किट	धा	दीं	ता	तिट	कत	गदि	गन	पखवाज.
	×		०		२		०		३		४		

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकताल

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	
ठेका–	धीं	धीं	धागि	तृक	तूं	ना	क	त्ता	धीं	तृक	धीं	ना	तबला.
	×		०		२		०		३		४		

आडाचौताल

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	
ठेका–	धीं	तिरकिड	धीं	ना	तूं	ना	क	त्ता	तिरकड	धी	ना	धी	धी	ना	त०
	×		२		०		३		०		४		०		

ताल झूमरा

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	
ठेका–	धीं	ऽ	धा,तृक	धीं	धीं	धागि	तृक	तीं	ऽ	ता,तृक	धीं	धीं	धागि	तृक	त०
”	धीं	धीं	नत	”	”	”	”	तीं	तीं	नत	”	”	”	”	”
	×			२				०			३				

ताल धमार

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	
थपिया–	क	धि	ट	धि	ट	धा	ऽ	क	त्ति	ट	ति	ट	ता	ऽ	पखवाज.
	×					२		०			३				

ताल दीपचंदी

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	
ठेका–	धीं	धीं	ऽ	धा	ग	तीं	ऽ	ता	तीं	ऽ	धा	ग	धीं	ऽ	तबला.
	×			२				०			३				

तिलवाडा

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
ठेका–	धा	तृक	धीं	धीं	धा	धा	तीं	तीं	ता	तृक	धीं	धीं	धा	धा	धीं	धीं	तबला
	×				२				०				३				

त्रिताल (पंजाबी)–हा विलंबित त्रिताल आहे.

मात्रा–	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
ठेका–	ता	धीं	धीं	धा	धा	धीं	धीं	धा	धा	तीं	तीं	ता	ता	धीं	धीं	धा	तबला.
	×								०				३				

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संगीत कार्यालय
नया मूल्य
रु०
हाथरस।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ श्री ॥

हिंदुस्थानी संगीतपद्धति

क्रमिक पुस्तकमालिका

सहावें पुस्तक

ग्रंथकार

कै. पं विष्णु नारायण भातखंडे

संपादक

प्रोफेसर श्रीकृष्ण नारायण रातांजनकर

प्रिन्सिपॉल, मॅरिस कॉलेज, लखनौ.

पंडित वाडिलाल शिवराम

प्रिन्सिपॉल, बान्सदा संस्थान संगीत विद्यालय.

प्रकाशक व सह-संपादक

भालचंद्र सीताराम सुकथनकर, एम्. ए., एल्.एल्. बी.

सॉलिसिटर, हायकोर्ट, मुंबई.

आवृत्ति पहिली

प्रति ५०००

शके १८५९] [सन १९३७

कागदी, रु. ३-१२-०] किंमत [कापडी, रु. ४-४-०

(पोस्टेज निराळें).

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हें पुस्तक १८६७ च्या २५ व्या ॲक्टाप्रमाणें नोंदवून सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

Printed by S. V. Parulekar, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Home, Sandhurst Road, Girgaon, Bombay No. 4.

and

Published by Bhalchandra Sitaram Sukthankar, M. A., LL. B., Solicitor, at 6, Walkeshwar Cross Lane, Malabar Hill, Bombay No. 6.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रागांची अनुक्रमणिका.

राग (६८) चीजा (२३७)

मारवा थाट

राग (११)	चीजा (३६)	पृ.
पूर्व्या (पूरवा)	२	३
पूर्वकल्याण	१	७
मालीगौरा	७	९
जैत (जेत)	२	१९
वराटी (वरारी)	३	२६
विभास	६	३२
पंचम	५	४०
भटिहार (भटियारी)	४	५०
भंखार	२	५६
साजगिरी	२	६१
ललितागौरी	१	६६

काफी थाट

राग (३७)	चीजा (१३५)	पृ.
सैंधवी (सिंदूरा)	१०	७१
सिंध	१	८४
बरवा	७	८६
पंजाबी बरवा	१	९३
धनाश्री	३	९५
धानी	१	१०२
प्रदीपकी (षटदीपकी)	२	१०५
हंसकंकणी	३	१०८
पलासी	१	११२
मध्यमादि सारंग	७	११६
शुद्ध सारंग	२	१२५
वडहंस सारंग	५	१२९
सामंत सारंग	१	१३८
मियांकी सारंग	४	१४१
लंकदहन सारंग	१	१४७
पटमंजरी	२	१५०
सूहा	१०	१५४
सुघराई	१३	१६८
सुहा-सुघराई	१	१८५
शहाना	५	१८७
नायकी कानडा	१०	१९६
देशाख्य (देवसाख)	४	२११
कौशिक कानडा (कौंसी)	३	२१८
मेघमल्लार	११	२२५
सूरमल्लार	९	२४५
रामदासी मल्लार	३	२५९
नटमल्लार	३	२६५
मीरांबाईकी मल्लार	१	२७२
चरजूकी मल्लार	१	२७३
चंचलसस मल्लार	१	२७४
धूलिया मल्लार	१	२७५
रूपमंजरी मल्लार	१	२७७
श्रीरंजनी	१	२८०
आभोगी	३	२८३
चंद्रकौंस	१	२८८
गौड	१	२९१
मालगुंज	१	४१४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आसावरी थाट

राग (१०)	चीजा (५०)	पृ.
देसी	१५	२९७
कोमल देसी	१	३१९
गांधारी	८	३२२
देवगांधार	३	३३३
खट	१२	३३९
खट-तोडी	१	३५८
जंगला	२	३६०
झीलफ़	३	३६५
गोपि(का)वसंत	३	३७१
सिंध भैरवी	२	३७६

भैरवी थाट

राग (५)	चीजा (९)	पृ.
बिलासखानी तोडी	५	३८१
मोटकी	१	३८८
भूपाल तोडी	१	३९१
उतरी गुणकली	१	३९३
वसंतमुखारी	१	३९६

तोडी थाट

राग (५)	चीजा (७)	
गुर्जरी तोडी	१	४०१
लाचारी तोडी	२	४०४
लक्ष्मी तोडी	२	४०६
बहादुरी तोडी	१	४०८
अंजनी तोडी	१	४११

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्नाय-ग्रन्थालय,
भरतनिधि, करौंदी
वाराणसी-5

॥ श्री ॥

सहावें पुस्तक

मंगलाचरण

गजाननं सिद्धिनाथं सर्वमंगलकारिणम् ।
वन्देऽत्रकार्यपूर्त्यर्थम् रागताल महोत्सवे ॥

प्रस्तुत मालिकेच्या आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पांच भागांतून आपल्या प्राचीन, मध्यकालीन व अर्वाचीन संगीताची शक्य तितकी माहिती आलीच आहे. आतां या मालिकेंतला हा शेवटला ग्रंथ छापला जात आहे. ग्रंथकारांनीं अविश्रांत मेहनतीनें, व कल्पनातीत स्वार्थत्यागानें मिळविलेल्या अमूल्य खानदानी चिजांच्या ठेव्याचा हा शेवटचा घटक जनतेच्या स्वाधीन केला जात आहे. रागांची शुद्ध स्वरूपें, व चिजांचे बोल, आजकालचे नुमत्या ऐकून उडविलेल्या चिजा गाणारे गवई, किंवा स्वयंमन्य "संगीताचार्य" किंवा 'संगीतकलानिधि", "अपने अपने तानमें चिडियां हैं मस्तान" या न्यायानें, भ्रष्ट करून लोकांपुढें गात असतात व लोकाभिरुचि बिघडवीत असतात. तेव्हां सदर रागांचीं खरी ग्रंथगत स्वरूपें काय आहेत, व चिजांचे शुद्ध बोल काय आहेत, हे लोकांपुढें मांडण्याचा या मालिकेचा प्रयत्न आहे; व रसिक गुणीजन त्याचा योग्य तो उपयोग करून घेतील अशी आशा आहे. प्रत्येक रागाचे एक विशिष्ट व इतर सर्व रागांहून भिन्न असें स्वरूप असतें. व त्या स्वरूपामुळें अमुक एक विशिष्ट रंग उत्पन्न होत असतो. तेव्हां एखादा राग सुरू करून त्यांत नंतर तीन चार दुसऱ्या रागांचीं मिश्रणें करीत बसण्यांत शहाणपणा तर नसतोच, पण उलट अश्लाध्य असा रसहानीचा

३-४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोष मात्र पदरीं येत असतो. कोणीहि घरंदाज गवई असें करीत नाही. रागस्वरूप शेवटपर्यंत कायम ठेवण्यांतच खऱ्या गायकाची किंमत असते; व विद्यार्थ्यांनीं, या मालिकेंत व "हिंदुस्थानी संगीत पद्धतींत," विस्तृत वर्णिलेलीं राग-स्वरूपें कसून प्रयत्न करून आत्मसात् केलीं पाहिजेत, व आपलें गायन त्या स्वरूपांस धरून शुद्ध ठेविलें पाहिजे. तानालाप करतांना, फारच काळजी घेऊन इतर कोणत्याहि रागाची यत्किंचित छटाही दिसणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे; तरच तें गाणें पद्धतशीर गाणें समजलें जाईल.

प्राचीन व मध्यकालीन संगीतांत होत जाणारा फरक

संगीत, अर्थात् देशी संगीत, हें परिवर्तनशील असल्यामुळें कालावधीन त्यांत फरक होत जाणें अपरिहार्य आहे. तदनुसार मुसलमानी अंमलाच्या काळीं आपलें संगीत प्राचीन ग्रंथोक्त संगीताला बरेंच सोडून गेलेलें असें होतें. त्यांतहि पुढें बदल होत होत आजच्या आपल्या संगीताला मध्य-कालीन संगीतापासूनहि वेगळेंच स्वरूप आलें आहे. आणखी कांहीं काळानें यांतहि फरक होत जाईल. प्रचलित रागांचीं स्वरूपें बदलतील, व नवे नवे राग, नव्या धर्तींचीं गीतें, नवे नवे गाण्याचे ढंग, क्वचित पाश्चात्य संगीताचेंहि मिश्रण हीं प्रचारांत येतील. तशीं चिन्हेंहि हल्लीं दिसूं लागलीं आहेत. यांत कांहीं नवीन नाहीं. देशी संगीताचा हा स्वभावच आहे. त्याचा उद्देश लोक-रञ्जनच असतो, अर्थात् त्याची वाढ लोकरुचीला अनुसरून होणें साहजिक आहे. तथापि प्राचीन संगीत लुप्त होण्याला, मध्यकालीन व अर्वाचीन संगीतांत एवढी तफावत पडण्याला, व आजकालच्या मनसोक्त मतभेदांना, स्वरलिपीचा व विषयाचे स्पष्ट व निश्चयात्मक विवरणाचा अभाव, हाच बहुतांशीं कारण आहे हें येथें नमूद केलें पाहिजे. आजच्या संगीताला आधार मुख्यतः शिष्यानुशिष्यपरंपरेचा आहे. अशा परिस्थितींत आपल्या वेळीं रूढ व सर्वमान्य झालेल्या संगीत तत्त्वांचें पद्धतवार स्पष्टीकरण करणें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व तदनुसार कार्याकार्यांचें यथायोग्य दिग्दर्शन करणें, तद्विषयक आदर्श समाजापुढें ठेवणें, प्रचलित संगीताच्या परंपरेचा शक्य तितका शोध लावणें व यापुढें त्याची प्रगति कोणत्या दिशेनें होणें इष्ट आहे याची चर्चा करणें हेंच संगीतशास्त्रकाराचें कर्तव्य आहे.

प्राचीन संगीताचे उपलब्ध असे आधार ग्रंथ म्हणजे नारदीशिक्षा, मांडूकीशिक्षा, भरतनाट्यशास्त्रांतला कांहीं भाग, बृहद्देशी व संगीत रत्नाकर हे मानले जातात. पण या ग्रंथांचा खुलासा श्रुति, स्वर, ग्राम, मूर्च्छना व जाति यांच्या यथायोग्य सिद्धीवर अवलंबून आहे. आतां यांची सिद्धि परस्परावलंबी असून त्यांचे त्या काळचे अर्थ आज लुप्त झाल्यामुळें हे ग्रंथ आतां दुर्गमच झाले आहेत. तरी हा भाग कोणीं तदनंतर प्रचारांत आलेल्या तत्त्वांचा आधार न घेतां, त्या ग्रंथांतूनच शोध करून समजाविल्यास हवाच आहे.

मध्यकालीन ग्रंथांचीं शुद्ध स्वरसप्तकें कर्णाटकी पद्धतींत ‘ कनकांगी ’ व हिंदुस्थानी पद्धतींत ‘ सैंधवी ’ (आजची काफी) हीं सिद्ध झाल्यामुळें ते ग्रंथ आतां कोणासही सहज समजण्यासारखे झाले आहेत. या ग्रंथांचे काळींहि प्राचीन ग्राम, मूर्च्छना, जातींची पद्धति नष्ट होऊन, दक्षिणेंत जन्यजनक (थाट-राग) व्यवस्था व उत्तरेंत कांहीं ठिकाणीं राग-रागिणी व्यवस्था, व कांहीं ठिकाणीं जन्य-जनक व्यवस्था प्रचलित झाली होतीं हें सहज लक्षांत येईल. या ग्रंथांत वर्णिलेल्या रागांपैकीं कांहीं लुप्त झाले आहेत व कांहींचीं अगदींच वेगळीं रूपांतरें आज प्रचारांत आहेत. या ग्रंथांत पुनः पुष्कळ ठिकाणीं आपसांत मतभेद आढळतो. तेव्हां त्यांचा आजच्या संगीताला आधार ग्रंथ म्हणून उपयोग क्वचितच होईल. अलबत् ज्या रागांचे बाबतींत हल्लींच्या प्रचारांचें व या ग्रंथांचें अंशतः तरी एकमत असेल तेथें ते आधार तेवढ्यापुरते जरूर कामीं येतील. अशी एकवाक्यता “ हिंदुस्थानी संगीत पद्धति ” या शास्त्रीय ग्रंथांत कांहीं रागांचे वर्णनांत पटविलीहि आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गेल्या शेंदोनशें वर्षांतील प्राकृत व उर्दू संगीत ग्रंथ

मुसलमानी अंमलाचे शेंवटीं शेंवटीं म्हणजे अलीकडील सुमारें दोनशें वर्षांच्या अवधींत कांहीं उर्दू व हिंदी ग्रंथ संगीतावर लिहिले गेले, त्यांपैकीं तोफत्–उल्–हिंद, नगमाते–आसफी, सरमा-ए-अशरत्. राधागोविंद संगीत-सार, संगीत कल्पद्रुम, व नादविनोद हे मुख्य होत. या ग्रंथांत त्या वेळीं प्रचलित असलेल्या रागांचीं स्वरूपें स्वरांनीं लिहिलेलीं सांपडतात. त्यांतले पुष्कळसे आज प्रचारांत आहेत. व त्यांचीं स्वरूपें प्रचाराशीं मिळतीं येतात. येवढ्यापुरताच या ग्रंथांचा उपयोग होऊं शकेल. यांतील शास्त्रीय भाग विश्वासनीय नाहीं. या ठिकाणीं " प्रचार " हा शब्द घराणेदार चीजांतून दिसून येणारा रागांचे स्वरूपांचा प्रचार या अर्थी आम्हीं योजिला आहे.

यानंतर गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांपासून राजेरजवाड्यांच्या पदरीं असलेल्या मोठमोठ्या नामांकित गायकवादकांचा संबंध साधारण जनसमाजाशीं येऊं लागला, रागदारी संगीताचा प्रसार लोकांत होऊं लागला, व या विषयाची तात्त्विक चिकित्सा सुरू झाली.

मध्यकालांतील रागवर्गीकरणें

मध्यकालीन संगीतांतील राग-रागिणींचीं स्वरूपें आज बरींच पालटून गेलीं आहेत. त्यामुळें त्या वेळच्या राग-रागिणींचीं वर्गीकरणें आज कामीं येणार नाहींत. शिवाय या वर्गीकरणांच्या मूळतत्त्वांचा खुलासा तोंडीं किंवा ग्रंथांत कोठेंच उपलब्ध नसल्यामुळें तसल्या प्रकारचीं नवीं वर्गीकरणें प्रचारांत आणणें सुलभ नाहीं. आजकालच्या अप्रसिद्ध रागांविषयींच्या साधार निरा-धार सर्व प्रकारच्या मतभेदांकडे पाहतां तसला प्रयत्न यशस्वी होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. पुढें मागें अनुकूल परिस्थितींत तें काम साधल्यास उत्तमच. नाहींपेक्षां समंजस अशी जन्य-जनक (थाट राग) व्यवस्था स्वीका-रून चालणेंच आजच्या संगीताला हितावह होईल. या पद्धतीला पूर्वाचाराचाहि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आधार आहे. दक्षिणेचे सर्व ग्रंथकार व उत्तरेचे लोचन, श्रीनिवास, हृदय-नारायणदेव हे आपले राग याच पद्धतीनें समजावितात.

आजकालचा श्रुतिस्वरवाद

आजकाल श्रुतिस्वरवादाला बरेंच महत्त्व येत चाललें आहे. प्रत्येक रागाचीं स्वरांतरें वैज्ञानिक उपकरणांचे मदतीनें व गणितानें सिद्ध करून तीं नियमित करण्याकडे आमच्या संगीत-गणित्यांचें लक्ष वेधलें आहे. या अव्यापारापासून प्रचलित संगीताला तादृश लाभ होणार नाहीं असें आमचें मत आहे. सूक्ष्म स्वरांतरान्वयें केलेली रागरचना अतिक्लिष्ट होणार. तशांत हीं स्वरांतरें भरत व शार्ङ्गदेव यांचे पदरीं बांधल्यानें त्यांचा गौरव होण्याऐवजीं त्यांना अन्यायच होईल.

रागाची व्याख्या व तींतील 'स्वर' व 'वर्ण' या शब्दांचें महत्त्व

योऽयंनिध्वविशेषस्तु स्वरवर्णं विभूषितः ।
रञ्जको जनचित्तानां स रागः कथ्यते बुधैः ॥

अशी रागाची व्याख्या पूर्वापार चालत आली आहे. यांत ' ध्वनि ' हा शब्द एकाच आवाजाचा वाचक नसून तो विशिष्ट नादरचना दर्शवितो. ध्वनींचें समष्टिरूप येथें उद्दिष्ट आहे. उर्दूंत याला 'नगमा' असें म्हणतात. या व्याख्येंत ' स्वर व ' वर्ण ' हे शब्द सूचक आहेत. रागरचना स्वरांनींच झाली पाहिजे. श्रुतिभेदांनीं अगणित मूर्च्छना किंवा मेल उत्पन्न करून त्यांत राग अवघे शेंदोनशें आम्हीं गाणार; म्हणजे, " मीयां मूठ, दाढी सवाहाथ " अशी अनवस्था होणार. अहोबल पंडितांनीं पारिजातांत पहिल्यानें एकुणतीस स्वर सांगून त्यांत एक, एक, श्रुतिभेदानें असंख्य मूर्च्छना व कूटताना सांगितल्या. पण रागाध्यायांत पुनः या एकुणतिसांपैकीं कांहीं ध्वनिसाम्यामुळें, व बाकीचे रागांत वापरण्यांत येणार नाहींत म्हणून एकंदर सतरा स्वर सोडून राहिलेल्या बारा स्वरांवरच आपली राग-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रचना सांगितली आहे. हे बारा स्वर बहुतेक आज आपण वापरतों तेच आहेत. रत्नाकरांत देखील बावीस श्रुतींचें वर्णन करून त्यांपैकीं चौदाच घेऊन त्यांना स्वर म्हणून त्यांवर रागव्यवस्था समजाविली आहे.

फक्त एकाच श्रुतिभेदानें दोन राग निरनिराळे मानण्यास आजचे कोणी गायकवादक कबूल होणार नाहींत. त्यांतून श्रुतीचें नियतप्रमाण आम्हां-पाशीं नाहींच. एकाच रागांत एकाच स्वराच्या जागा गमक भेदांनीं व निरनिराळ्या स्वरोच्चारांनीं व स्वरसंगतिमुळें उंचनीच होत असतात हा अनुभव प्रत्यक्ष गाणाऱ्या वाजविणाऱ्यांस वारंवार येतो. भैरवाचे <u>री</u>, <u>ध</u>, कानड्याचे <u>ध</u>, <u>ग</u>, मीयांमल्लाराचे <u>नि</u>, <u>ग</u>, ललिताचे मं, ध, देशीचा <u>ध</u>, वसंताचे मं, <u>ध</u> इ. यांच्या जागा कोठें कोठें व किती कायम करणार? करितां, कोमल, तीव्र या स्वरांच्या मर्यादा स्वीकारून सर्वमान्य झालेल्या बारा स्वरांवरच रागरचना करणें हाच सरळ व सुलभ मार्ग होय. राग-व्यवस्थेस बाराच स्वर पुरे आहेत. सूक्ष्मान्तारित नाद एवढीच श्रुतीची कल्पना आजच्या संगीताला उपयोगी आहे. बारा स्वरांव्यतिरिक्त बाकीच्या स्वरांस अलंकारिक, तीव्र कोमलांच्याच अंतर्गत, रागांत येणाऱ्या विविध स्वरसंगतीं-मुळें, गमकांमुळें किंवा स्वरोच्चारांमुळें लागणारे स्वर, असे मानणेंच योग्य होईल. आमच्या संगीतांत "हार्मनी" (विविध स्वरांचें सहोच्चारण) दाखल होईल तर व तेव्हां सूक्ष्म स्वरांतरें कायम करणें प्राप्तच होईल. पण "हार्मनी" आली म्हणजे राग नष्टच होणार. तोपर्यंत रागांच्या हयातींतच त्यांची उत्तरक्रिया नको आहे. प्राचीन कालीं ध्वनि मापण्याची यंत्रें नसल्या-मुळें, अमुक एक स्वराच्या पुढील स्वर कोठला हें समजविण्यापुरताच श्रुतींचा उपयोग होता, असें कांहीं विद्वानांचें मत आहे, तें देखील विचार करण्यासारखें आहे. एका ध्वनिपासून दुसरा ध्वनि स्पष्ट निराळा ओळखूं येण्यासारखा जरासा चढवला म्हणजे एक श्रुत्यंतर झालें. अमुक एक स्वर 'नी' कल्पून, पुढें अशीं तीन श्रुत्यंतरें ओलांडून येईल त्या चौथ्या श्रुत्यंतरावर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आमचा " सा, " आहे अशी स्वरवर्णनें आपले प्राचीन पूर्वज देत असत, व तेवढाच श्रुतींचा उपयोग असे. पुढें असें अनिश्चित प्रमाण निरुपयोगी समजलें जाऊन, स्वरांची ठिकाणें, वाद्यावरील तारेची लांबी, पडद्यांच्या आधारें किंवा तारेवर बोटें ठेवून, कमी कमी करीत नेऊन समजावलीं जाऊं लागली. व आतां तर ती यंत्रानें, अनुरणनाच्या मापानें सांगितली जातात. तेव्हां आतां श्रुतींचा मुळींच उपयोग नाहीं, असें कोणी म्हणतात, यांतही कांहीं तथ्य नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

" जाति " हें निबद्धगान असावें

राग गायनाचे पूर्वीं, जातींचें गायन असे, असें कळते. या जातींचीं प्रत्यक्ष ध्वनिरूपें आज उपलब्ध नाहींत; तीं प्राचीन ग्रंथांतून त्यांच्या शुद्ध स्वर मेलांच्या यथार्थ सिद्धीच्या अभावीं शोधून काढणें दुरापास्तच आहे. पण जातींच्या रचनेच्या तत्त्वांवरून व रत्नाकरांत दिलेल्या त्यांच्या उदाहरणां-वरून जाती हा एक प्रकारचीं निबद्धगीतेंच (बांधलेलीं गीतें) असावींत असें कोणी म्हणतात. प्रत्येक जातीचे ग्रह, अंश, न्यास, मंद्रतारांच्या मर्यादा, इतकेंच नाहीं तर तालहि ठरलेले असत. जातींच्या गायनांत गाणाराला आपल्या पदरचें कांहींएक योजण्याची मोकळीक नसे.

रागालाप

या जातींतूनच पुढें रागांची उत्पत्ति झाली व हे नियम थोड्याफार प्रमाणांत रागांना लागूं लागले. रागगायनांत आलापांचा प्रचार पुढें आला. शास्त्रोक्त क्रम नियमांना अनुसरून गायकाला आपल्या अंगस्वभावानें रागाचा विस्तार करण्याची मोकळीक रागालापांत मिळाली. पुढेंपुढें नियमांकडे दुर्लक्ष होत गेलें. त्यांच्या योजनेंतहि फरक होऊं लागला. आजकाल तर हे जुने नियम नष्टप्रायच झाले आहेत. आज अमुक राग अमुकच स्वरावरून सुरू केला पाहिजे व अमुकच स्वरावर संपविला पाहिजे असा नियम नाहीं. चीजांतहि हीच स्थिति अनुभवास येते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वादीसंवादी

प्राचीन पारिभाषिक शब्दांचे अर्थहि आज बदलले आहेत. प्राचीन काळीं वादीसंवादी अनुवादी व विवादी हे त्या त्या स्वरांच्या आपसांत असलेल्या ध्वनिसंबंधावर अवलंबून असत. पण हे संबंध प्राचीन ग्रंथकारांनीं श्रुतिंच्याच परिभाषेंत वर्णन केल्यामुळें त्यांचा व स्वयंभू षड्जपंचम भाव, षड्जमध्यम-भाव वगैरेसारख्या गणिती संवादांचा मेळ बसत नाहीं. भरत–शार्ङ्गदेवाच्या उक्तींना अनुसरून, श्रुति नियतप्रमाणाची स्वीकारिल्यास, नादशास्त्राच्या गणिती तत्त्वांना बाध येतो. प्राचीन ग्रंथांना क्षणभर बाजूला सारून आजच्या रागांना गणित लावून पाहावें तर तेंहि जुळत नाहीं. कारण वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें आपले बहुतेक स्वर "चल" आहेत. ते निश्चल असते तर त्यांना गणिताची दोरी लावून अडकविलें असतें. सारांश, आज वादीसंवादींचा अर्थ बहुत्त्वाल्पत्त्वाच्या तत्त्वाला अनु-सरून केला जातो. "प्रयोगे बहुलःस्वरः । वादी राजाऽत्र गीयते ॥ विवादी तु सदा त्याज्यः । क्वचित्तान क्रियात्मकः" ॥ इत्यादि व्याख्याच आजच्या वादीविवादींचे आधार आहेत. साधारणतः वादीपासून संवादी ५ वा किंवा ४ था असावा हा नियम आजकाल सर्वमान्य आहे.

रागगायन म्हणजे काय ?

ठराविक स्वरपंक्तिला, ठराविक क्रमनियमांनीं, तींतील स्वरांचें परस्पर वजन, अर्थात् बहुत्त्वाल्पत्त्व राखून, तिचें वैशिष्ट्य न बिघडूं देतां, मेहन-तीनें कमाविलेल्या आवाजांत, अथवा हस्तकौशल्यानें वाद्यांवर, आपल्या अंगस्वभावानें व अनुभवचातुर्यानें रंगवून आळविणें, यालाच आम्ही आज "राग संगीत" किंवा "रागदारी संगीत" म्हणतों. हल्लींच्या रागरचनेचे व रागविस्ताराचें कांहीं ठळक नियम या मालिकेच्या पांचव्या भागांत दिलेच आहेत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवाजाची कसरत व तानालाप

आपल्या संगीतांत गायन हें प्रधान आहे. वाँद्नाला व नर्तनाला आधार गीताचाच आहे अशी आपल्या येथें सर्वसाधारण समजूत आहे.

गायनाचें मुख्य अंग कंठस्वर (आवाज) आहे. विशेष मधुर आवाज हा ईश्वरदत्त असतो असें मानलें, तरी गाण्यास निरुपयोगी असा आवाज असणारीं माणसें फारच विरळा. शेंकडा ९५ माणसांचा आवाज गाण्या-लायक होऊं शकतो. साधारण आवाज असलेल्या माणसांना कसरतीनें तो सुरेल बनवितां येतो. ही आवाज बनविण्याची कसरत योग्य रीतीनें झाली पाहिजे. या महत्त्वाच्या बाबतींत आमच्या येथें बरेंच औदासिन्य दिसून येते. आवाज चांगला बनण्यास मुख्य तीन गोष्टींची जरूर आहे.

(१) आवाज योग्य रीतीनें काढणें

(२) आवाज स्थिर राहणें व

(३) श्वासनियंत्रण

योग्य रीतीनें आवाज काढण्याची तालीम न मिळून, चुकीच्या कसरती-मुळें आवाज सुरेल बनण्याऐवजीं बिघडल्याचीं उदाहरणें आमच्या येथें पुष्कळ सांपडतात. खुद्द गाण्यावर पोट भरणाऱ्या लोकांत कसलेला आवाज असलेले लोक शेंकडा वीसाहि मिळणें कठीण आहे. गाण्याचा रियाझ करतांना आवाज चोरटाहि काढूं नये व जोरानें कर्कश वाटेल किंवा खोकला येईल असाहि काढूं नये. चोरट्या आवजांत गाऊन कितीहि मेहनत केली तरी ती फळास येणार नाहीं. तसेंच फार जोरानें आवाज काढला तर तो कर्कश व जड होईल. आवाज नेहमीं 'आ' कारांत काढावा. 'अॅ' असा रेंकल्यासारखा किंवा "ऑ" असा फार गोल असा आवाज काढणें हीं दोन्ही दोषास्पद आहेत. "आ" कारांत आवाज काढणें अंगवळणीं पडलें म्हणजे 'इ' कार, 'उ' कार, 'ओ' कार हे पण चांगले सुस्वर येऊं लागतील. यांचा गाण्यांत फार कमी उपयोग होतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवाजांत वजन, स्थिरपणा येण्यास व श्वासनियंत्रण साधण्यास आरंभींच सावकाश लईंत योग्य स्वरांवर चांगला मुक्काम करीत गाणें जरूर आहे. पहिल्याप्रथमच धांवपळीनें गाण्याचा रियाझ केला तर स्वर जाग्यावर लागणार नाहींत व गाण्यांत वजनहि राहणार नाहीं.

सुरवातीला ताना मारण्याची घाई करूं नये. आवाज स्थिर झाल्या-नंतरच तानांच्या मेहनतीकडे वळावें. तान शुद्ध " आ " कारांत घ्यावी व तिचा वेग हळु हळु, स्वरस्थानाकडे नीट लक्ष देऊन वाढवीत जावा. कधीं कधीं " य-य-य " अशा किंवा जबड्याच्या ताना मोठमोठे गायक देखील घेतात. या तऱ्हेची तान कांहीं जुन्या उस्तादांनीं मुद्दाम, आवाज प्रतिकूल असतांहि मेहनतीनें साधली होती. त्यांची तऱ्हा त्यांच्या शिष्यपरंपरेंत उतरली व ही तान रूढ होऊन गेली आहे. पण शुद्ध ' आ ' काराची तान साधल्यास जबड्याच्या तानेची फारशी जरूर नाहीं. तिचा उपयोग कांहीं जोरदार गमकाच्या तानांत कधीं कधीं फार तर होऊं शकेल. तानेची कसरत करतांना, कधींहि स्वरांवर धक्के देत देत करूं नये. तसें केल्यानें गळा जड होईल; व जलद तान कधींहि निघणार नाहीं. स्पष्ट आवाजांत, ' आ ' कारांत, सहज लीलेनें, जेवढ्या गतींत तान साफ व सुस्वर निघेल तितक्याच गतींत ती फिरवावी. लहान लहान स्वरसमुदायांची सरळ उलट-पालट, आरोहअवरोह करीत, व त्यांची जोड करीत करीत, तान फिरविली असतां ती चांगली तयार होईल. सरळ व वांत्र आरोहावरोहाची तानहि अशा कसरतीनें साधेल.

रागदारी संगीताचा परिणाम सर्वसाधारण श्रोत्यांवर व्हावा तसा होत नाहीं ह्याचीं कारणें

संगीताची वाढ लोकरुचीला अनुसरून होते हें मागें म्हटलेंच आहे. अभिरुचि हा नित्यपरिचयाचा परिणाम आहे. ज्या प्रकारचें गाणें लोकांच्या कानांवर नेहमीं पडत जाईल, त्या प्रकारचेंच गाणें त्यांना नेहमीं आवडत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जाईल. साधारण श्रोतृसमाजाला पक्क्या रागदारी संगीतांत, तें शब्द-प्रधान नसल्यामुळें किंवा शब्दोच्चार व शब्दार्थाकडे गायकांचें दुर्लक्ष असल्यामुळें, गोडी येत नाहीं. परकीय भाषेंतील व्याख्यानाप्रमाणेंच तें गाणें त्यांना वाटतें. गायकाच्या हातवाऱ्यांशिवाय त्यांना त्यांत कशाचाहि बोध होत नाहीं. तशांत अवास्तव तानांचा भडिमार पडत चालला म्हणजे श्रोते बिचारे हवालदिलच होतात. यामुळें रागदारी संगीताविषयीं त्यांना अनास्था वाटूं लागल्यास नवल नाहीं.

आजकाल रियाझी गायक किती आहेत? पूर्वीं दिवसांतून बारा बारा तास मेहनत करून गळा कमाविलेल्या गायकांच्या गोष्टी आपण ऐकतों. त्या निवळ गप्पा नसून खरोखरीच तसले रियाझ करणारे गायक होते, हें ज्यांना गायकांशीं विशेष सहवास घडला आहे त्यांना पटतें. तसा रियाझ करणारे आज बोटांवर मोजण्याइतकेहि नाहींत पण तसला रियाझ आजच्या काळांत करणें अगदीं अशक्य नाहीं, तरी फारच थोड्या लोकांना शक्य आहे. पूर्वीं गायकांना राजाश्रय असे; नोकरी सुखाची असे; कधीं काळीं दरबारांत गाण्यावाजविण्यास जाण्याखेरीज करून त्यांना दुसरें कांहींच काम नसे. त्यामुळें हवा तेवढा रियाझ करण्यास ताकद व भरपूर वेळ असे. आजचे गायक बहुतेक तालमीवरच पोट भरणारे असल्यामुळें, दिवसभर तालमींत घसा सुकवून आल्यानंतर त्यांच्याकडून एक तासहि रियाझ होणें अशक्य होतें. हा परिस्थितीचा दोष आहे. त्या गायकांचा नाहीं. पण रियाझाच्या अभावामुळें आवाजांत व गाण्यांत फिकेपणा येतो हेंहि खोटें नाहीं. रागदारी संगीतांत प्रत्येक स्वर न स्वर कसदार लागल्याशिवाय रागाचा इष्ट परिणाम होत नाहीं. मग श्रोत्यांना तें न आवडलें तर त्यांत त्यांचा काय दोष? आजकाल लोकगीत, काव्यगान, संगीत पदें, गझल ठुमऱ्यांसारख्या शब्दप्रधान गीतांचा प्रादुर्भाव, हा उच्च संगीताच्या दारिद्र्याचाच परिणाम आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संगीतांत शब्दांचें महत्त्व

संगीतांत शब्दार्थांचें महत्त्व या विषयावर अलिकडे आमच्या विद्वानांचें लक्ष लागलें आहे. कवि व गायक यांत "मदर्थायत्त्वम्" ची चढाओढ सुरूं आहे. संगीत हे रसानुवादी असावें ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु सध्यां प्रचारांत असलेल्या, व लोकाभिरुचीला पसंत असलेल्या "रागदारी" संगीतांत शब्दांचें महत्त्व फार नसतें असें बहुतेक गायकांचें मत आहे. शब्दांना आळविणारीं गीतें, ठुमरी, गझल, भजन, चैती, कजरी, सावन, वगैरे आहेतच. ख्याल गायनांत शब्दांच्या अर्थाकडे मुद्दाम लक्ष देऊन गाणारा सध्यां क्वचितच मिळतो. शब्दार्थाला व रागाला सयुक्तिक असा विस्तार होऊं शकला तर तो इष्टच आहे व या दृष्टीनें भावी संगीताची वाढ झाली पाहिजे. पण द्रुतगतींत, तान वगैरे घेतांना शब्दार्थाला सांभाळून गाणें जवळजवळ अशक्यच होतें. उदाहरणार्थ, "आज राधे तोरे बदन पर श्याम मिलै की चौरी" या रामकलीतल्या ख्यालांत रागाची सावकाश बढत चीजेच्या शब्दार्थाला धरून चांगली होऊं शकेल, पण पुढें द्रुत ताना घेतांना बिचाऱ्या राधेला खाकोटीला मारूनच पळावें लागेल. तें नको असलें तर द्रुत लयींत न जातां ख्याल मध्येंच आटोपता घ्यावा लागेल. पण हें व्हावें कसें? आजकाल तान हें ख्यालाचें एक महत्त्वाचें अंगच रूढ होऊन बसलें आहे, व श्रोतेहि तें ऐकण्याला सोकावलेले आहेत. तानांशिवाय गाइलेला ख्याल म्हणजे पक्वान्नावांचून केलेलें प्रयोजन असें त्यांना वाटतें. रसपरिपोषाकडे दुर्लक्ष करून बांधलेल्या कांहीं चीजांचे शब्द रागांच्या प्रकृतिला साजेलसे नसतात. उदाहरणार्थ "हूं तो जनम न छांडूं, निसदिन प्रेम पिया के संग" या शब्दांत कामिनीच्या हृदयाचे उद्गार आहेत. हेंच पद जैजैवंती, देसी वगैरे सारख्या स्त्री प्रकृतिक रागांत असते तर शब्दार्थाला सांभाळून रागविस्तार उत्तम झाला असता पण रसांविषयीं अज्ञानामुळें, चीज बांधणारानीं ती गंभीर प्रकृतीच्या कामोदांत बांधली आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कामोदांत या शब्दांकडे विशेष लक्ष देऊन गाणें कठिणच पडणार. आतां नवीन चीजा बनतील व त्या रूढ होतील तोंपर्यंत जुन्या चीजांच्या शब्दार्थांवर भर देऊन, रागांच्या प्रकृतिला व आपल्या घराण्याच्या गायकीला बिघडविण्याला कोणीच सांप्रदायिक गायक कबूल होणार नाहीं असें वाटतें. पुनः नवीन चीजा बनविणारा स्वतः उत्तम गायक व तसाच उत्तम कवि असेल तरच तो यशस्वी होईल. जुन्या चीजांपैकीं फारच थोड्या राग व रस यांकडे लक्ष देऊन बांधल्या आहेत. रागांना मूर्त स्वरूपें देऊन, त्यांचीं स्पष्ट आदर्शस्वरूपें आठवणीसाठीं, उदाहरणादाखल कांहींतरीं शब्दांच्या चौकटींत करून ठेवणें एवढाच त्यांत हेतु असावा. या चीजांत रागांचा ठळक अंगें संकलित करून, पाठ करण्यासाठीं रागांचीं आदर्शस्वरूपें म्हणून त्या बनविलेल्या असाव्यात. गायकाला एखाद्या रागांत एखादा सुंदर तुकडा सुचतो. तो सांभाळून ठेवण्यासाठीं कांहीं तरी शब्दांची ठेवण लागते. त्या तुकड्याला योग्य अशीं अक्षरें, विशेष काव्य-प्रसादाच्या फंदांत न पडतां, पसंत करून त्यांत तो बांधितो. जुन्या गीतांचे विषय बहुतेक ठरलेले म्हणजे, कृष्णलीला, ऋतुवर्णन, ईशस्तुति व क्वचित् संगीताचे मूळ सिद्धांत असे होत. त्या तुकड्याचे नादसौंदर्य शब्दार्थांत व्यक्त करणें केव्हां केव्हां अशक्य असतें. अर्थात, भावी पिढीनें नवीन गीतें रागरसांकडे लक्ष देऊन बांधावी, व त्यांचा आलापप्रसारही त्या भर्तीवरच करावा; व तसें केल्यास दुधांत साखर पडल्यासारखें होणार आहे. परंतु सध्याच्या खानदानी चिजा रागरसानुवर्तक नाहींत, यागोष्टीकडे दुर्लक्षच केलें पाहिजे; व त्यांची मोडतोड करण्याच्या भानगडींत न पडलेलें बरें.

संगीताचें मराठीकरण

संगीताचें मराठीकरण ही कल्पना तरी या गीतांतल्या शब्दार्थ लावण्याच्या कल्पनेचीच एक शाखा आहे. गाणारे, त्यांना कसलेहि शब्द मिळाले तरी त्यांची तोडमोड करून ते आपल्या आलाप व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तानांत भरणार. पण मराठी श्रोते मराठी शब्दांचे हाल पाहून नाक मुरडतील. हिंदुस्थानी भाषेंत जोडाक्षरें फार नाहींत. तीं असलीं तरी वेगळीं करतां येतात. एऱ्हवीं बोलतांना तीं तोंडींत नाहींत. पण कवितेंत तीं तोडलीं जातात हें विशेष आहे. तसेंच कांहीं संस्कृत शब्दांचें कोमल रूपांतर त्या भाषेंत होतें. जसें "भ्रमर" चें "भंवरा," "चन्द्र"चें "चन्दा" किंवा "चांद," "संध्यांचें" "सांझ," "मध्याचें" "मांझ" किंवा "मध," "मार्गा"चें "मग," "निष्ठुर"चें "निठुर," थट्टा"चें "ठठोरी," "निर्लज्ज"चें "नीलज" इत्यादि, अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील. मराठीची अशीच कांहींतरी मोडणी खास संगीताकरितां करावी लागेल.

हिंदुस्थानी संगीत व मराठी भाषा हीं दोन अगदीं वेगवेगळ्या प्रकृतीचीं आहेत. त्या संगीताच्या स्वभावांत एक प्रकारचा धीमेपणा, दरबारी ऐट, बेफिकिरी, लवचीकपणा, षौखीनपणा आहे. हेच गुण त्या हिंदुस्थानी भाषेंतहि आहेत. मराठीच्या गांभीर्याला, सडेतोडपणाला, शिस्तीला व चिकित्सकत्त्वाला हे गुण अगदीं विरुद्ध पडतात. समाजाच्या साधारण स्वभावाचा प्रभाव त्याच्या भाषेवर व शिल्पकलांवर पडतो ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. मराठी गीतें गाऊंच नये असें आमचें म्हणणें नाहीं. पण तीं लोकगीत, (फोक म्युझिक) या खातीं जातील. मराठी लावण्या, काव्याच्या दृष्टीनें उत्तमच आहेत. तसेच पोवाडे, अभंग, ओंव्याही आहेत. लावण्या म्हणजे मराठी ठुमऱ्याच. त्यांना स्वरांनीं उत्तम शृंगारितां येण्यासारखें आहे. नाटकांतलीं गीतें आज ख्यालवजा गायक लोक गाऊं लागले आहेत. किंबहुना, या गीतांना व काव्यगानाला आजकाल महत्त्व येत चाललें आहे. जुन्या चीजांच्या अभावीं, गाण्यावर उपजीविका करणारांना, केवळ लोकाग्रहास्तव व लोकरंजनार्थ, बैठकीवरच नाटक करावें लागत असल्यास नवल नाहीं. बंगाल्यांत हिंदुस्थानी संगीत गाणारे व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बंगाली गीतें, व डॉ. टागोर वगैरे सारख्यांचीं गीतें गाणारे, असे दोन वर्गच आहेत. तोच प्रकार पुढें महाराष्ट्रांत होणार. त्यांत विशेष अशी हरकत नाहीं. पण हिंदुस्थानी संगीताला मिटवून, त्याचें मराठीकरण महाराष्ट्रापुरतें सुद्धां यशस्वी होईलसें वाटत नाहीं. एकीकडे आम्ही सर्वत्र एकाच प्रकारचें संगीत झालें पाहिजे, म्हणजे दक्षिण व उत्तर पद्धति यांचें सुद्धां एकीकरण झालें पाहिजे, स्वरलिपिहि सर्व देशाची एकच झाली पाहिजे असें म्हणावयाचें व पुनः हिंदुस्थानी संगीताचें मराठीकरण हवें, असें म्हणावयाचें, म्हणजे " इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः " अशी आमची स्थिति होणार! उत्तमोत्तम नवे ख्याल मराठी भाषेंत बांधले गेले, तर ते कोणास नको आहे? परंतु ते जुन्या ख्यालाइतके सुंदर, बांधेसुद व आकर्षक झाले पाहिजेत. नाहींतर लोक जुनेच पसंत करतील.

या मराठीकरणावर चर्चा करतांना "आमच्याकडील बायकांना, तुमचें तें पिया, सैयां, गुइयां, आणि सास ननंदांचीं भांडणें कांहीं कळत नाहींत व कळलीं तरी त्यांना तीं आवडावयाचीं नाहींत" अशी फिर्याद कधीं कधीं ऐकण्यांत येते. आम्ही म्हणतो कीं, म्हणूनच तीं हिंदुस्थानींत आहेत तीच ठीक आहेत. स्वरांचा तरी आनंद घेतां येतो. त्यांचें मराठीकरण झाल्यास, त्यांचे झालेले हाल पाहून खानदानी गायकांना खचित रडूंच येईल.

अभिरुचि

अभिरुचिही एक मनःस्थिति विलक्षण आहे. व्यवहारांत आवड निवड पसंती, विशेषार्थी प्रेम वगैरे नांवानीं ती ओळखिली जाते. ती प्रारब्धा, आनुवंशिक कीं प्राकृतिक आहे याचा तात्त्विक शोध अझुनहि झालेला नाहीं. तो मानसशास्त्राच्या तज्ज्ञांकडेच सोंपवावा लागेल. पण साधारण अनुभवानें आम्हांसारख्यांना अभिरुचि हा नित्य संसर्गाचा परिणाम असावासें वाटतें. एखाद्या गोष्टीचा चिर परिचय झाला असतां ती आपणांस आवडूं लागते. याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आमचेकडील कांहीं मंडळी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाश्चात्त्य संगीताला नांवें ठेवतां ठेवतां, विलायतेला जाऊन त्या लोकांचे 'सिम्फनीझ्' व 'ऑपेराझ्' वगैरे ऐकून, पहिल्यानें कांहीं दिवस नाक मुरडून, त्या संगतीचा नेहमीं नेहमीं कानावर पडून विशेष परिचय झाला व त्याचें रहस्य कळूं लागलें म्हणजे, त्याचे गोडवे गात परत येतात हेंच होय.

संगीताच्या सौंदर्याची प्रचीति येण्याला आपले कान तयार झाले पाहिजेत या उक्तिचें रहस्य तरी हेंच होय. संसर्गाचा परिणाम चिरस्थायी असतो. लहानपणीं किंवा आपली संगीताशीं नवीनच ओळख होत असतां ज्या गायकाच्या गाण्यानें आपल्याला या कलेची रुचि लागलेली असते, तो गायक व त्याचें गाणें, वस्तुतः फार उच्च प्रतीचें नसलें तरी, या गोष्टीची जाणीव पुढें विशेष अभ्यासानें आपणास झाली असली तरी, आपल्याला इतरांपेक्षां अधिक प्रिय वाटतो. त्या गायकापेक्षां कितीहि विद्वान व कुशल गायक त्यानंतर आपण ऐकिले तरी त्यांचें वजन इतकें आपणांवर पडत नाहीं, ही अनुभवाची गोष्ट आहे. प्रत्येक गायकाचे केवळ भक्तच असे कितितरा असतात. कांहीं प्रसंगीं तर प्रत्यक्ष गायक गायक एकाच बाजूला राहून त्यांच्या भक्तां भक्तांतच भांडणें झालेली पाहून मोठी मौज वाटते. एका गायकाच्या भक्तांनीं दुसऱ्या गायकाला शिव्यांची लाखोली वाहिलेली आपण नेहमीं ऐकतों. गायक आपसांत स्नेहभावानेंच वागतात. क्वचित् धंद्याच्या चढाओढींत एका गायकानें दुसऱ्याची निंदा केली तरी ते एकमेकांची किंमत ओळखून असतात. हीं भक्तांभक्तांतलीं भांडणें कानांवर गेलीं तर त्या गायकांना सुद्धां हंसूं आल्यास नवल नाहीं. या भक्तांना अमुक गायक तुम्हांला कां आवडतो व दुसरे कां आवडत नाहींत असा प्रश्न केला तर कांहींतरी न पटण्यासारखें उत्तर मिळतें. त्याचें कारण त्यांना सांगतां येत नाहीं. पण त्यांचा आदर किंवा अनादर हा मनापासूनचा असतो यांत शंका नाहीं. याला दुसरें कारण शोधूं गेल्यास मिळणार नाहीं. संसर्गाचाच हा परिणाम हेंच शेवटीं म्हणावें लागतें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जसा गायकाविषयीं व्यक्तिगत आदर श्रोत्यांत असतो, तसाच त्याच्या शैली, ढंग वगैरे बद्दलहि असतो. ज्या प्रकारच्या गाण्याचा संसर्ग श्रोत्यांस विशेष असतो त्याच प्रकारचें गाणें त्यांना पसंत असतें. गायकांचीं घराणींहीं याचींच द्योतक आहेत. कुशल गायकाच्या गाण्याचा रंग त्याच्या शिष्यानुशिष्यांच्या गाण्यांत उतरतो व ती एक गायकी कायम होते, व गायकपरंपरा तशीच श्रोतृपरंपराहि प्रस्थापित होते.

आजकालच्या परिस्थितिचा मैफलींवर परिणाम

आजचा काळ घाईचा आहे. वसल्या बरोबर आवाज लागणारा व दहा मिनिटांत एक चीज संपविणारा गायक आज लोकांना हवा आहे. रात्रभर गवैयाच्या आवाजासंगती व तब्रियती संगतीं रेंगाळत वसण्यास श्रोत्यांना वेळ नाहीं. गाणाराची तबियत रुजूं होते न होते तोंच एखादा श्रोता मधेंच आपल्या मनगटावरील घड्याळाकडे पाहूं लागतो. तो एखादा असला तरी चाणाक्ष गायकाच्या तबियतीचा विरस करण्याला पुरे होतो. गाणें चाललें असतां बाजारभावाच्या गोष्टी करणाऱ्या अरसिक लोकांविषयीं आपण ऐकतोंच. पण वर म्हटलेल्या सारखा श्रोता फारच भयंकर. घड्याळाकडे पाहून तो जणूं काय गायकाला "हं, हें ऐकलें, आतां पुढें चला." अशीच सूचना देतो. अशा श्रोत्यांना थोडें गाण्याचें ज्ञानहि असतें. पण ते नुसते नमुने ऐकणारांपैकीं असतात. वरवर ऐकून, "अशा प्रकारच्या रागांत अशी ही चीज आहे", एवढेंच समजण्याची त्यांची जिज्ञासा असते.

आजकाल गायकाची परीक्षा, तो गळा किती जलद फिरवूं शकतो, तबलजीशीं धुमश्चक्री करण्यांत पट्टा आहे कीं नाहीं, रागांत नवेनवे स्वर लावूं शकतो कीं नाहीं, हातापायांची धिंगामस्ती विशेष करतो कीं काय, कितव्या पट्टींत गातो, उंच स्वरांत गाऊनहि तार सप्तकाच्या उत्तरांगापर्यंत पोहोंचतो की नाहीं, ऐटींत बसतो कीं नाहीं, मधून मधून चटकदार चीजा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकवतो कीं नाहीं, या गोष्टींवर आहे. अलिअलीकडे तर पाश्चात्य संगीता-सारखे कांहीं प्रकार गायक वादकांना करावे लागतात. राग शुद्धता, चीज म्हणण्याचा ढंग, आवाज लावण्याची तऱ्हा, स्वरविन्यास रचण्याचें कौशल्य, स्वरांवरचे मुक्काम, स्वरस्थानें, गायकीची पद्धत, कसलेल्या गळ्यांत साहजिक लागणारे कण, लयींचे चमत्कार, समेवर येण्याची खुबी, समप्रकृतिक रागांपासून प्रस्तुत रागाला वांचविण्याच्या युक्त्या, स्वरांचें परस्पर अल्पत्त्व व बहुत्त्व, व रागाच्या एकंदर स्वरूपाचा मनावर होणारा परिणाम या गोष्टींकडे क्वचितच कोणाचें लक्ष असतें. अर्थात् ही स्थिति फारच अनिष्ट आहे. या मालिकेंत दिलेल्या खानदानी चिजांचा मुख्य हेतू, या बाबतींवर भर टाकण्याचा आहे, व राग, शब्दार्थ व रस यांची सांगड घालण्याचा नाहीं.

संगीतविद्यार्थ्यांची प्रगति

कोणाच्याहि संगीत शिक्षणाचा इतिहास मोठा मौजेचा असतो. त्यांत साधारणतः तीन पायऱ्या असतात. प्रथम नुसता नादलुब्धपणा असतो. कोणाचें तरी सुस्वर व गोड गाणें ऐकून गाण्याची रुचि उत्पन्न होते. या स्थितींत रागशुद्धि वगैरे गोष्टींकडे त्याचें लक्ष नसतें. नुसतें गोड लागलें त्यांत शब्द चांगले असले म्हणजे त्याला तें गाणें पसंत पडतें. पुढें, हा इतका अलौकिक सौंदर्याचा ठेवा आपल्यापाशींहि असावा अशी इच्छा होऊन त्याला संगीत विद्या शिकण्याची इच्छा होते. साधारण स्वरज्ञान व रागज्ञान झाल्यानंतर त्यांची वृत्ति चिकित्सक, किंबहुना छिद्रान्वेषी होते. ही दुसरी स्थिति. या स्थितींत असतांना, आपण शिकल्याप्रमाणें हुबेहुब कोणीं गाइलें नाहीं तर त्यास तो गाणारा चूक आहे असें वाटतें. पण पुढें चांगल्या चांगल्या लोकांचीं गाणीं कानांवर पडल्यानंतर व विशेष अभ्यास झाल्यानंतर मग त्याला, गायक व शैलीचें वैचित्र्य, रागांतर्गत स्वरांच्या परस्पर अल्पत्त्वबहुत्त्वाचें रहस्य, स्वरोच्चारांचें विविधत्त्व हीं कळून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येतात. रागांत स्वरविन्यासांची जोड लावण्यांतच सारी कुशलता असते. निपुण गायकांचें रागावर पूर्ण स्वामित्त्व असतें. तो रागाचा दास नसतो. कधीं रागाला आंजारीत गोंजारीत, कधीं त्याशीं लपंडाव खेळत, कधीं भक्तिभावानें त्याची पूजा करीत, गायक त्यांत स्वतः लीन होऊन, श्रोत्यांस आपल्या संगतीं चालवीत असतो. आणि हें ओळखणाऱ्या श्रोत्यांची त्याला फारच किंमत वाटते. या तिसऱ्या स्थितीला पोहोंचलेले श्रोते बहुधा स्वतःच कुशल गायक असतात. गातां गातां मध्येंच कोठून "आतां एखादें सौभद्र नाहींतर स्वयंवर होऊं द्या" अशी फरमास आली म्हणजे ढेंकूळ मारल्याप्रमाणेंच त्या विचाऱ्या गायकाची स्थिति होऊन जात असेल. गायकलोकांत अशी एक म्हण आहे "कद्रदान हमारे गुलाम और बेकद्रके हम गुलाम".

सारांश संगीताची प्रगति गायक वादकांवर तितकीच श्रोत्यांवरहि अवलंबून असते. लोकरुचीला वळण लावणारे गायक वादक व त्यांच्या कलेला पुनः वळण लावणारी लोकरुचि असा हा परस्पर संबंध आहे.

राग व रस

रागांच्या सौंदर्याचें मूळ शोधून काढतां काढतां रागांतून रस उत्पन्न करण्याचा उपक्रम सुरूं झाला आहे. व त्यालाच जोडून पुढें सांसारिक जीवनाशीं संगीताचा संबंध जोडण्याचे प्रयत्न कित्येक ठिकाणीं सुरूं आहेत. थोडक्यांत म्हणायचें म्हणजे संगीताची सगुण उपासना सुरू होत आहे, या परिस्थितीला नांवें ठेवण्याचा उद्देश येथें नाहीं. या गोष्टी अपरिहार्य आहेत. संगीतकला ही आतां लोकाश्रयी झाल्यामुळें, जनरुचीला अनुसरून असले प्रकार होणें साहजिक आहे.

काव्य, चित्रकला व संगीत यांची सांगड घालण्याची वहिवाट जुनीच आहे. कांहीं मर्यादेपर्यंत या तीन्ही कलांच्या फलनिष्पत्तींत साम्य असावें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असा भास होतो. वास्तविक ' रस ' काव्यान्तर्गत विषय आहे. पण वर निर्दिष्ट केलेल्या कारणामुळें रागांतूनहि रसोत्पत्ति व्हावी असें आम्हांस वाटल्यास नवल नाहीं. संगीताला आवाजाशिवाय दुसरें साधन नाहीं. नुसत्या आवाजाविषयीं म्हटलें तर हंसणें, रागावणें, रडणें, लाडाचा आवाज काढणें भीतीनें किंवा आश्चर्यानें ओरडणें इत्यादि गोष्टींनीं लगेच ते आवाज काढणाऱ्या व्यक्तीच्या मनःस्थितीची जाणीव होते. पण हे आवाज एकमेकांपासून किती उच्चनीच असतात हें जाणणें, त्यांचें स्वरलेखन करणें, व ते कोणत्या रागांत कसे उपयोगीं होतील याचा निर्णय करणें, ते कोणत्याहि उपलब्ध रागांत खपत नसल्यास त्या त्या रसांचे परिपोषक असे नवीन राग उत्पन्न करणें हें ओघानेंच आलें. लयीचा व शब्दांचा आधार स्वरांना घेतल्यास कांहीं अंशीं हें साध्य होईल.

रसपरिपोष हें संगीताच्या विविध फलांपैकीं एक आहे. राग व रस या विषयाची तात्त्विक चर्चा अजून व्हावयाची आहे. हा विषय वाटतो तितका सोपा नाहीं. नुसतें " सरीवीरेद्भुते रौद्रे " इत्यादि प्राचीन ग्रंथोक्तींचे आधार आजकालच्या स्वरांना व रागांना लागू करून हा प्रश्न सुटला असें होत नाहीं. ज्या ग्रंथांचीं अवतरणें आम्हीं आधारादाखल घेऊं, त्यांचे स्वर व आजकालचे स्वर हे नाम व लक्षण यांनीं एकच आहेत काय, हा प्रश्न सोडविल्याखेरीज हे आधार निर्मूल आहेत. शिवाय स्वर हे सापेक्ष आहेत. पूर्वींच्या जाती गायनांत पर्यायांश सुद्धां असत. तेव्हां एकाच जातींत निरनिराळ्या स्वरांना केंद्रस्थान देऊन निरनिराळे परिणाम उत्पन्न करणें याचा प्रचार त्यावेळीं गायनांत होता. केंद्रस्थान बदलल्यानें रागांतील इतर स्वरांवरहि परिणाम होतो हें अनुभवसिद्ध आहे. तेव्हां कोणत्या स्वराचा व रागाचा कोणता रस हें ठरविणें निदान आजकालच्या संगीतांत फारच कठिण आहे. त्यांत किती तरी गोष्टींचा विचार करावा लागणार आहे. हें पाहतां हें काम सोपें नाहीं याची कल्पना सहजच येईल. एकच राग

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विविध गायकांनीं, विविध प्रसंगीं, विविध श्रोत्यांसमोर, विविध प्रकारचीं गीतें गाऊन एकच परिणाम झाला तर त्या रागाचा अमुकच रस असें ठरवितां येईल. यांत किती प्रकारचे प्रयोग करून पहावे लागतील ! एकाच गायकाची: मनःस्थिति नेहमीं सारखी असेल असें नाहीं. तेंच श्रोत्यां-विषयींहि म्हणतां येईल. ठरीव राग गाण्याला वातावरण दरखेपेस एकाच प्रकारचें असेल असाहि नियम नाहीं. सारे गाणारे एकच राग एकाच शैलीनें गातील असाहि नियम नाहीं. उलट गायक कुशल असला तर एकच राग निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या रंगांनीं गाऊं शकतो. तो ज्या मनःस्थितींत असेल तसा त्याचा राग वठतो. या सर्व विविध प्रयोगांतून सुरक्षित पार पडून, रागाचा परिणाम एकच झाला तर मात्र त्याचा निश्चय होऊं शकेल.

विचाराअन्तीं असें वाटूं लागतें कीं, रागांचा प्रत्यक्ष संबंध रसांशीं लावणें अत्यंत कठिण आहे. भावना उत्पन्न होण्याला गाण्याची शैली, योग्य आवाज, उच्चार, गाण्याची लय, गीतांतले शब्द, किंचित् अभिनय या गोष्टीहि रसोत्पत्तीला आवश्यक आहेत. यांच्या यथायोग्य प्रयोगानें रसांचा बराच परिपोष होतो. आतां कांहीं ठोकळ विधानें कोणी करूं शकेल. जसें मोठाल्या स्वरांतरांनीं करुण किंवा शांत रस उत्पन्न होणार नाहीं तसेंच लहान स्वरांतरांनीं वीर किंवा रौद्र रसाची भावना होणें अशक्य आहे. शंकरा, मालश्री, कामोद, केदार, हमीर, नट, वगैरे रागांत शांत किंवा करुण रस उत्पन्न करण्याचा प्रयत्न त्या रागांच्या साधारण स्वभावाला जुळणार नाहीं. तसेंच श्री, भैरव, जोगिया, आसावरी, तोडी, पीलु, भैरवी वगैरे रागांत रौद्र किंवा वीर रस उत्पन्न होणार नाहीं. पण हेंहि एक प्रकारचे तर्क आहेत असें समाजायच. रागांचे नुसते आलाप केले किंवा बीनावर जोडकाम केलें तर कोणता रस होईल हें सांगतां येणार नांहीं. ते राग ऐकल्यानें मनावर परिणाम जरूर होतो. प्रत्येक राग आपापला विशिष्ट परिणाम श्रोत्यांच्या मनावर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठसवतो. राग हे सुगंधी फुलांप्रमाणें आहेत. फुलांच्या सुगंधानें रसोत्पत्ति होत नाहीं; तरी मनाला एक प्रकारचा अवर्णनीय आनंद होता व तें उत्तेजित होतें, तल्लीन होतें, एकाग्र होतें व त्याच्या सर्व शक्तींना चलन मिळतें. त्याचप्रमाणें रागाच्या सुश्राव्य गायनवादनानें मनावर परिणाम होतो. पण तो परिणाम अमुकच रस असें कसें सांगतां येईल? त्या परिणामाचें वर्णन करणें शक्य नाहीं. त्याला फार तर नादमोह म्हणतां येईल. हा "नादमोह" इतर मनोविकारांपासून स्वतंत्र आहे असे मानणारेहि लोक आहेत. सध्यांतरी प्रत्यक्ष प्रयोगांच्या अभावीं रागांच्या रसांविषयीं निश्चयात्मक असें कांहींच म्हणतां येणार नाहीं.

रागदारींत सांसारिक जीवनाचें दिग्दर्शन

आतां सांसारिक जीवनांचें दिग्दर्शन संगीतांत कितपत होईल तें पाहणें आहे. रागदारी संगीताचा उपयोग यांत फारसा होईलसें वाटत नाहीं. तें एक अलिकडच्या लोकरुचीला अनुसरून नवीनच संगीत प्रचारांत येऊं लागलें आहे. हा एक लोकगीताचाच प्रकार होणार आहे. त्यांत गीताचे शब्द, आजूबाजूचें वातावरण, गीताचा ताल; वाद्यांची योजना, गायकाचा आवाज, गीताचा संदर्भ वगैरे गोष्टींना महत्त्व येणार आहें. हें गाणें नुसत्या गाण्याकरितां नसून दुसरा उद्देश साधण्यासाठीं लागणाऱ्या साहित्यांपैकीं आहे, पण याचीहि वाढ आपल्या संगीत तत्त्वांच्या आधारानें झाली तर इष्ट आहे.

संगीतव्यवसायी लोकांचे वर्ग

संगीतव्यवसायी लोकांचे स्वभावतः मुख्य चार वर्ग होतात. हे वर्ग वाग्गेयकार अथवा नायक, कलावंत, शिक्षक व शास्त्रकार हे होत. या प्रत्येकाचें ध्येय व त्यासाठीं लागणारीं साधनें व उपाय हीं निरनिराळीं असल्यामुळें, हे चारहि वेगवेगळे धंदेच होतात. या चारहि वर्गांत उच्च दर्जाला पोहोंचलेला क्वचितच आढळतो. अशी व्यक्ति म्हणजे खास संगीतोद्धारासाठींच अवतार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घेतलेली विभूतीच समजली पाहिजे. याखेरीज करून सर्वसाधारण संगीत व्यवसायी लोकांत वर नमूद केलेल्या पृथक पृथक शाखांत निपुण असलेले लोक सांपडतात. या विषयांपैकीं जरी एकच घेऊन त्यांत अधिकार संपादन केला, तरी तें एका माणसास पुष्कळ आहे. आतां हें खरें आहे कीं यांतील, प्रत्येकाचें थोडेंबहुत ज्ञान प्रत्येक सांगीतिकास आवश्यक आहे. निरक्षर कलाकार, स्वररागज्ञानरहित शास्त्रकार, संगीतज्ञानवंचित कवि, व अरसिक संगीत शिक्षक हे सर्वच आंधळे, वाट फुटेल तिकडे भटकणारे, असे असतात. पाश्चात्य देशांतहि संगीत व्यवसायी लोकांचे असे वर्ग झालेले दिसतात. वाग्गेयकारांत, स्क्यूबर्ट, बीथोवन, बॅाक, हँडेल, मोझार्ट, वाग्नर; कलाकारांत योहन्, क्यूबलिक, करूझो, पौलरोबसन्; शास्त्रकारांत हेल्मोल्ट्झ्, वुइल्यम् पोल; व संगीत शिक्षकांत सर ऑगस्ट मॅन्स्, बीचहॅम्, सर चार्ल्स् हॉल् असे लोक आपापल्या अंगीकृत विषयांतच नांवाजलेले आहेत.

वाग्गेयकार

वाग्गेयकाराला संगीत ज्ञान, उत्तम भाषाज्ञान, काव्यप्रसाद, रसिकता, लोकरुचीची ओळख, हे गुण अत्यावश्यक आहेत. मैफलींत गाण्यालायक गीतें बनविण्याची हौस असलेल्या कवीला, मग तो कितीहि उच्च दर्जाचा कवि असला, तरी संगीताचें थोडेंबहुत तरी सक्रिय ज्ञान संपादन करणें प्राप्त आहे. तसेंच रागदारी संगीताची रूढ झालेली जी हिंदुस्थानी भाषा तिचेंहि उत्तम ज्ञान संपादन करणें तितकेंच आवश्यक आहे. असें असलें तरच त्यांचीं गीतें सर्वमान्य होतील.

कलावन्त

क्रियासिद्धत्त्व हा कलावंताचा मुख्य गुण. नित्य अभ्यासानें गळा किंवा हात तयार ठेवणें हें कलावंताचें कर्तव्य व ध्येय. पूर्वींच्या संगीत विद्यार्थ्यां-पेक्षां आजच्या विद्यार्थ्यांची परिस्थिति पुष्कळ बरी आहे. स्वरज्ञान प्रथम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करून देणें हें तत्त्व आजच्या शिक्षणपद्धतींत रुजलेलें असल्यामुळें, प्रत्येक विद्यार्थ्यास कामापुरतें स्वरज्ञान आधींच झालेलें असतें. शिवाय पाठ्य पुस्तकांतून चीजाहि स्वरलिपिसहित लिहिलेल्या तयार असतात. पूर्वींच्या विद्यार्थ्यांस गुरूंनीं गाइलेलें नुसतें ऐकून व नंतर तें आठवून व गाऊन गाऊन आपल्या गळ्यांत बसवावें लागत असे. पण त्यामुळें गळ्याची मेहनत अजाणतां होत असे. आजकाल आमच्या डोक्यांतच सर्व गाणें असल्यामुळें गळ्याचीं मेहनत करून त्यांत तें साधण्याचें आम्हांस सुचत नाहीं. 'आहे पुस्तकांत, गरज पडेल तेव्हां थोडेंसें पाहून ठेवूं' अशा भरंवशावर राहून आम्ही मेहनतीबद्दल उदास असतों. पण प्रत्यक्ष गाण्या-वाजविण्याचा प्रसंग आला म्हणजे डोक्यांतलें गळ्यांत उतरत नाहीं आणि मग त्या गाण्याचें हाल काय विचारावें? स्वरज्ञान व पुस्तकांचा उपयोग संगीत डोक्यांत भरण्यासाठीं नव्हे तर तें गळ्यांत किंवा हातानें वाद्यावर उतरविण्यासाठीं आहे, हें संगीत विद्यार्थ्यांनीं लक्षांत असूं द्यावें. अर्थात् ही सूचना कलावंताच्या धंद्यांत शिरणाऱ्या विद्यार्थ्यांस आहे हें समजेलच. स्वरज्ञान व पुस्तकें यांच्या मदतीनें अर्धी मेहनत वांचली. आतांचे विद्यार्थी समजून मेहनत करूं शकतात. त्यांना शिकलेल्या गीतांची अथवा ताल आलापांची वारंवार आवृत्ति करून गळ्यांत किंवा हातांत माधुर्य आणण्या-पलिकडे कांहीं करावयाचें नसतें. शिवाय आजकालच्या ग्रामोफोन, रेडिओ वगैरे यंत्रसाधनांमुळें चांगलें आदर्श त्यांचेपुढें नेहमीं असतात. तेव्हां इतिहासप्रसिद्ध कलवंतांसारखेच, किंबहुना सर्वोत्कृष्ट जगन्मान्य कलावंत या देशांत आजच्या काळांत तयार होणें अशक्य नाहीं.

संगीतशिक्षक

संगीताध्यापन हा एक महत्त्वाचा विषय आहे. संगीतशिक्षक मैफलीचा गाणारावाजविणारा जरी नसला तरी त्याला सुस्वर व सताल गाण्याचें वाजविण्याचें सामर्थ्य हें असलेंच पाहिजे. विद्यार्थ्यांवर एऱ्हवीं त्याचें वजनच

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पडणार नाहीं, पण याशिवाय आणखी कित्येक गुण त्याला हवे असतात. शांतवृत्ति, विद्यार्थ्यांच्या अडचणींची जाणींव व त्याविषयीं सहानुभूति, त्यांच्या आवाजाचा धर्म, ग्रहणशक्ति, रुचीचा कल, सहज व सोप्या मार्गानें मनोरंजक होईल अशा रितीनें त्यांना विषयाची समजूत करून देण्याची कला, व त्यांच्याकडून आस्थेनें मेहनत करवून घेण्याची हातोटी, प्रत्यक्ष गाऊन वाजवून त्यांच्यासमोर चांगले आदर्श ठेवण्याविषयीं तत्परता या सर्व गोष्टी उत्तम संगीतशिक्षकाच्या ठायीं असणें अवश्य आहे. उत्तम कलाकार उत्तम शिक्षक असेलच पाहिजे असा नियम नाहीं. उलट शिक्षण देणें हें कलाकाराच्या स्वभावाच्या व कर्तव्याच्या कांहीं अंशीं विरुद्ध आहे. त्यानें शिक्षण देणें म्हणजे प्रत्यक्ष कृति करून दाखविणें एवढेंच. तो नुसता एखाद्या सुंदर दृश्याप्रमाणें आदर्शात्मक असतो. एखाद्या उत्तम गायकाचें मैफलींत जमलेलें गायन ऐकून पुष्कळ लोक त्याजकडे तालीम घेण्याकरितां धांव घेतात. आधीं अशा गायकांचें मन शिष्यांसंगतीं रेंगाळण्यांत रमत नाहीं. यदाकदाचित् ते शिकवूं लागलेच तर स्वतःच आपल्या सामर्थ्या-प्रमाणें गाऊं लागतात व शिष्यास त्याप्रमाणें गाण्यास सांगतात. शिष्याचा गळा साधारण तयार असला तर तो गुरूची तान आपण गाण्याचा प्रयत्न करूं लागतो तोंच गुरूंना पुनः स्फूर्ति होऊन ते आणखी एक जबरदस्त तान त्याच्यासमोर चमकावतात व त्याची तारांबळ उडवितात. याप्रमाणें प्रत्यक्ष शिक्षण कांहींच होत नाहीं. शिष्यानें चिकाटी धरली तर फार तर तो गुरूंच्या ढंगाची थोडी नकल उतरवूं शकतो. त्यांतून बोटभर गुरूंचें व हातभर स्वतःचें असा रंग निघतो. आणि जर का शिष्य अगदींच कच्चा असला तर बिचारा गुरूंच्या सामर्थ्यानें नामोहरम होऊन आपण वाट चुकलों असें म्हणून थोड्याच दिवसांत माघारा फिरतो. मैफलीचा गाणारा, विद्यार्थ्यांसंगतीं स्वरस्थानें, चीजा, तान आलाप घोटूं लागला तर थोड्याच दिवसांत त्याचे कान बिघडून, त्याच्या गाण्यांतला प्रसाद लुप्त होईल, त्याला नवीन कल्पना सुचणार नाहींत. गाणें शिकवून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिकवून स्वतःच्या गाण्यांतला रस आटवून शुष्क होऊन बसलेल्या मैफली गवय्यांची कितीतरी उदाहरणें आहेत.

तसेंच संगीत शिक्षकानें मैफलींत गाऊन रंग जमवण्याची आशा राखूं नये. निरनिराळ्या तऱ्हेच्या विद्यार्थ्यांसंगतीं आवृत्त्या करतां करतां व त्यांचे अपस्वर व वेडेंवांकडे उच्चार सुधारतां सुधारतां, संगीत शिक्षकाचे गळा व कान यांचें स्थैर्य नष्ट होतें व तीं फाजील चौकस बनतात. स्वरस्थानें व ताल यांची मोजमाप करून गाण्याची संवय त्याला लागते व तो बैठकीवर मौज आणण्यासारखें गाणें गाऊं शकत नाहीं. पण विद्यार्थी तो उत्तम तयार करूं शकतो. पुष्कळ वेळां मोठमोठ्या नांवाजलेल्या गवैयांच्या उस्तादांची नांवेंसुद्धां श्रोत्यांनीं ऐकिलेलीं नसतात. बिचारे खांसाहेब पीर मुर्शीदांच्या नांवानें आपले कान जर्जर करतात तरी श्रोत्यांना इतके कान पकडण्या-सारखे खांसाहेबांचे उस्ताद होते तरी कसे, व त्यांची मैफलीच्या गायकांत प्रसिद्धि कशी नाहीं, याचें कोडें पडतें. पण फळावरून झाडाची परीक्षा, कार्यावरून कर्त्याची जाणीव या न्यायानें हे उस्ताद खरोखरीच पूजार्ह असतात.

संगीतशास्त्रकार

संगीत वाङ्मयाचा अभ्यास व तद्विषयक नवीन ग्रंथनिर्मिति, जुन्या अप्रसिद्ध ग्रंथांचे संपादन हाहि एक संगीतांतला स्वतंत्र व्यवसाय आहे. आपल्या संगीताचा पूर्वेतिहास, कालांतरानें आपल्या शुद्ध स्वरसप्तकांत, रागांत व गायनपद्धतींत होत गेलेला फरक, गीतप्रबंध, वाद्यें व वादनाचे प्रकार, ताल, नृत्य या विषयांचा इतिहास, संगीताचें आजचें स्वरूप, व त्याची पुढें योग्य दिशेनें उन्नति होण्यास इष्ट असलेल्या वस्तु यांचें विवरण, संगीत विषयक आदर्श प्रसिद्ध करणें इत्यादि संगीत शास्त्रकाराची मुख्य कार्यें होत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवाजाच्या धर्माला अनुसरून विद्यार्थ्यांचे वर्ग

विद्यार्थ्यांच्या आवाजाच्या धर्माप्रमाणें त्याला ध्रुपद, ख्याल, टप्पा किंवा ठुमरी यांपैकीं कोणच्याहि एका विषयांवर विशेष भर देऊन त्यांतच प्राविण्य संपादण्याकडे त्याचें लक्ष खेंचलें असतां हिताचें होईल. बारीक आवाजाच्या माणसानें ध्रुपद गाण्याचा प्रयत्न करणें जितकें निष्फळ आहे तितकेंच मोठ्या व भारी आवाजाच्या माणसानें ठुमरी गाणें निष्फळ आहे.

ध्रुपद म्हणजे तालाच्या धुमश्चक्रीचें गाणें आहे अशी समजूत कांहीं लोकांत आहे. रामपूरकडील तानसेनपरंपरेंत व साधारण पूर्वेकडील सर्व ठिकाणच्या ध्रुपद परंपरेंत तालाची खटपट मुळींच नाहीं. आधीं रागाचा सर्वांग परिपूर्ण आलाप ज्याला आपण व्यवहारांत "नोम् तोम्" असें म्हणतों, तो करून नंतर त्याच रागाचें ध्रुपद तालमीबरहुकुम व शुद्ध मुद्रा व शुद्ध वाणी राखून गावयाचें अशी तिकडील प्रथा आहे. ते लोक लयीची खटपट होरी, साध्या (झपताल, सूलताल, तेवरा वगैरे) तालांतल्या चीजा, तराणे वगैरे गीतांत करतात. ताल प्रधान ध्रुपद गाण्याची प्रथा केव्हां सुरू झाली व ती कोणीं सुरूं केली तें सांगतां येत नाहीं. पूर्वीं गायक वादकांच्या मोठमोठ्या राजेलोकांच्या दरबारांतून दंगली होत असत. त्या दंगलींतून गायक व पखवाजी यांच्या सामन्याची कल्पना निघून 'धा' ला 'धा' न शिवूं देण्याचा डाव निघाला असेल. दाक्षिणात्य गायक वादकांचाहि हात यांत असल्यास नवल नाहीं. तालप्रधान ध्रुपद गायन देखील, गायक व तालिया हे एकमेकांच्या नेहमींच्या वहिवाटींतले व सहकारितेनें काम करणारे असले तरच मनोरंजक होऊं शकतें. अर्थात योग्य स्वरस्थानें व कंठमाधुर्यही गाण्यांत असलींच पाहिजेत हें निराळें सांगणें नकोच. गायक व पखवाजी यांच्या संगतीच्या ध्रुवपदाऐवजी त्यांच्या विसंगतीचेंच ध्रुवपद आजकाल ऐकूं येतें. त्याचें फळ कोण हरला व कोण जिंकला याची मौज व संगीता-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नंदाच्या नांवानें शून्य हेंच. अशा गायनाला श्रोत्यांनीं विशेष आदर न दिला तर तें यथार्थ आहे. कित्येक तबलिये, पखवाजी यांस आपण वाजवायला बसलों असतां हिंदुस्थानांतील एकाहि गवैयाची किंवा ततंकाराची गाण्यावाजविण्याची हिंमत नाहीं यांतच कृतकृत्यता वाटते. अशांना " कधीं कोणाला गाऊं न देणारा तबलजी " अशी पाटी मारून म्युझिअम मध्यें लोकांच्या कुतूहलासाठीं ठेवावे. दुसरा त्यांचा उपयोग कांहीं नाहीं.

ख्याल गायनांत, रागाची क्रमवार बढत, जिला " अस्ताई भरना " म्हणतात ती, व पुढें तानप्रस्तार हीं मुख्य अंगें आहेत. चीजेचे योग्य विभाग करून, त्यांना सुस्वर व मधुर अशा आवाजांत रागाच्या स्वभावाला अनुसरून योग्य स्वरविन्यासांनीं शृंगारणें हेंच ख्याल गायन. हें करण्यास आवाज पातळ, फिरण्यासारखा लागतो. सर्वच विद्यार्थ्यांचा असा आवाज नसतो. करितां ख्यालासाठीं योग्य आवाजाच्या विद्यार्थ्यांची निवड केली पाहिजे. ख्याल गायनांत मागें म्हटल्याप्रमाणें शब्दांचें विशेष महत्त्व नसतें. जेणेंकरून रागाचें स्वरूप कौशल्यानें श्रोत्यांसमोर उभे राहील अशा रितीनें गाण्यांत सारी खुबी आहे. विशेषतः विलंबित लयीच्या ख्यालांत तबल्याची गडबड नुसत्या लयदार ठेक्याशिवाय जास्त नसावी. पुढें द्रुत ख्याल गातांना, लयींत ताना घेतांना, थोडींबहुत परणें साथीचीं विसंगत होऊं न देतां, तबलियानें घेतलीं तर मौज येते. अशीं कांहीं परणें ख्यालाच्या विद्यार्थ्यांनीं पाठ करून त्यांवर बांधलेल्या ताना मुखोद्गत करण्याची संवय केल्यास हिताचें होईल.

टप्पा, ठुमरी, व इतर असल्या प्रकारचीं गीतें अर्थप्रधान व शृंगारिक असतात. अशा गायनाला आवाज उंच सुराचा, लवचिक, व नाजूक असा असल्यास उत्तम. टप्यांत एक विशिष्ट प्रकारची तान, उदाहरणार्थ

नि ध प

निसां रें रें सानि, धनि सांसां निध, पध, निनि धप मप धध मम गम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नि ध प म ग
पध निसां सांनि निध धप पम मग अशीं येते. ती विद्यार्थ्यांकडून मुद्दाम तयार करून घ्यावी लागते. ठुमरींत गीताचीं सार्थ वाक्यें घेऊन त्यांना कोमल अशा स्वरविन्यासांनीं नटविणें, मधून मधून हलक्या आवाजानें छोट्याशा जलद व सरळ ताना घेणें, किंचित् सयुक्तिक हावभाव, क्वचित् रागांत विचित्र स्वरयोजना करून नाविन्य उत्पन्न करणें, अशा गोष्टी कराव्या लागतात. या दोन्ही प्रकारच्या गीतांत शब्दार्थाला महत्त्व आहे हें लक्षांत असावें. शब्दार्थाला विसंगत अशा ताना किंवा गमका या गीतांत घेतल्यास गाणें हास्यास्पद होईल.

या निरनिराळ्या गायकींना योग्य असे निरनिराळे विद्यार्थी निवडून त्यांना त्याप्रमाणें शिक्षण देणें ही जबाबदारी प्रत्येक संगीत शिक्षकावर आहे. ती त्यानें विसरतां कामा नये.

संगीतसंस्था

गेल्या दहाबीस वर्षांत होत असलेली संगीताविषयींची जागृति पाहून कोणाहि संगीतप्रेमी माणसास आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. आजकाल सर्व मोठाल्या शहरांतून जागजागीं संगीत शिक्षणाचे लहान मोठे वर्ग सुरू आहेत. घरोघर गाणें वाजविणें ऐकूं येत आहे. कांहीं ठिकाणीं सरकारी आश्रयाखालींहि संगीत संस्था चालू आहेत. विश्वविद्यालयांच्या पाठ्य विषयांत संगीतालाहि स्थान मिळविण्याचे प्रयत्न होत आहेत. या सर्व उत्साहाकडे पाहून एखाद्या प्रचंड संगीत संस्थेची ही पूर्वतयारीच आहे असें कोणासहि वाटेल. संगीताचें कार्यक्षेत्र पाहतां, हल्लीं असलेल्या संस्था म्हणजे त्या कार्याचा ओनामाच आहे असें म्हणावें लागेल. नुसते रागदारी संगीताचे वर्ग चालविणें एवढेंच कार्य हल्लींच्या संस्था करीत आहेत. वास्तविक नेहमींच्या वर्गांशिवाय, लोकगीत, नाट्यसंगीत व वाद्यसंगीत यांचेंहि शिक्षण, लोकगीतांतील पदांचीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नोटेशन्स व ग्रामोफोन रेकॉर्डस प्रसिद्ध करणें, नाटकाला अथवा बोलपटाला योग्य असें संगीत–रागांचा व रसांचा संबंध असल्यास, त्याचा यथायोग्य सप्रयोग निर्णय करून–निर्माण करणें, आपल्याकडील वाद्यांत व त्यांच्या संगीतांत कांहीं सुधारणा हवी कीं काय याचा विचार व त्याविषयीं प्रयोग, संगीतनिर्मिति, संगीतअध्यापन, संगीत–वाङ्मय इत्यादि विषयांचे वर्ग चालविणें, कर्णाटकी संगीताचें अवलोकन, संगीत–ग्रंथसंग्रहालयें, वाचनालयें, व नियतकालिकें यांचें संचालन, संगीत–परिषदा व मैफली भरविणें, वगैरे कार्यें या संस्थांचींच आहेत. पण या कार्यांपैकीं एकएकहि पार पाडण्यास विपुल द्रव्यसंचय हवा. त्याच्या अभावीं एका संस्थेला हीं कार्यें करणें अशक्य आहे. अमूर्त स्वरूपांत विस्कळित अशी ही संस्था आधींच चालू आहे. हल्ली पृथकत्वानें होत असलेल्या कार्यांचें संघटण करून मध्यवर्ती अशी संस्था कोठेंतरी एखाद्या मोठ्या शहरीं निर्माण होईल तो सुदिन. संगीतज्ञ व द्रव्यसामर्थ्य असलेल्या लोकांनीं योग्य अधिकाऱ्यांना हाताशीं धरून शिस्तवार व मोठी अशी एक संस्था उघडल्यास ती लवकरच भरभराटीस येऊन संगीत संगोपनाचें एक मोठेंच काय केल्यासारखें होईल. ही संस्था लवकरच अस्तित्वांत येवो अशी त्या जगन्नियन्त्यास प्रार्थना आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मारवा थाट.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मारवा थाटांतील राग (११)

पूर्व्या किंवा पूरवा
पूर्व-कल्याण
मालीगौरा
जैत किंवा जेत
वराटी किंवा बरारी
विभास

पंचम
भटिहार किंवा भटियार किंवा भटियारी
भंखार
साजगिरी
ललिता-गौरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग पूर्व्या अथवा पूरबा

पूर्व्या अथवा पूरवा हा राग मारवा थाटांतून उत्पन्न होतो. यांत पूर्वी, पूरिया व मारवा या रागांचा संयोग आहे. पंचम वर्ज्य आहे व दोन्ही धैवत आहेत. हा संध्याकाळीं गाइला जातो. याचा विस्तार मन्द्र व मध्य सप्तकात होतो.

याचें स्वरूप असें आहे.

सा, नि़रे॒ध़सा, नि़रे॒ग, मंग, निनि, धमंधमंगरे॒गरे॒सा, रे॒नि़,
मं़ध़॒सा, सारे॒सा, नि़, रे॒गमंधमंगरे॒सा । निधमंगरे॒
गरे॒नि़रे॒नि़मं़ध़॒सा, सारे॒सा, नि़, रे॒गरे॒गमंधमंधगरे॒
गनिंधमंगरे॒, सा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पूरबा—तिलवाडा (विलंबित)

स्थायी.

नि़ सासा	सा रीध़	सा	नि़सा,री	ग	–	ध गमंमं	,ग	ध मं	ग	ध मं	ध
एक	पल	हुं	ऽऽ,न	जा	ऽ	नेऽऽ	ऽन	दे	ऽ	हों	ऽ
३				×				२			

निनिधमं	धधमंग	मंमंगरी	गगरीसा
ऽऽऽऽ	ऽऽऽऽ	ऽऽऽऽ	ऽऽऽमि
०			

सा	–नि़	री	सासा	सा नि़री	गरी	सा नि़री	सा	रीरीसानि़	सारीगरी	ध गमंमं	मं,गमं
या	ऽऽ	को	ऽबो	होत	दिन	बीऽ	ते	मेऽऽऽ	रेऽऽऽ	ऽऽऽ	ऽ,ऽऽ
३				×				२			

री ग	री	गरी	सा
आ	ऽ	ऽऽ	ये।
०			

अंतरा.

सां निधमं	गरीसा	नि़रीनि़ध़	मं ध़सासा	नि़ सा	सानि़	री	सा	सा रीरीसानि़	सारीगरी	ध गमंमं	मं,गमं
मेरेजा	नकाम	मूऽरत	सोअब	सा	ऽऽ	ऽ	हा	बिऽऽऽ	कऽऽऽ	मेऽऽ	ऽ,ऽऽ
३				×				२			

री ग	री	गरी	सा
पा	ऽ	ऽऽ	ये।
०			

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

			सा
सासा	रीधसा	निसा	,निरी
एक	पऽल	ऽ,ऽऽ	,हुंन
३			

पूरबा—तिलवाडा (विलंबित)

स्थायी.

नि			सा			ध	
सानि	रीध	सा	,निरो	ग	–	गमंमं	,ग
मौंऽ	ऽऽ	ऽ	,दर	बा	ऽ	ऽऽऽ	ऽजे
३				×			
ध		ध					
मं	ग	मं	ध	निंनिधमं	धधमंग	मंमंगरी	गंगरीसा
बा	जे	रे	ऽ	ऽऽऽऽ	ऽऽऽऽ	ऽऽऽऽ	ऽऽऽऽ
२				०			
नि				नि			
सा	सानि	सा	–	सा	सानि	री	सा
ना	ऽऽ	थू	ऽ	गो	ऽऽ	री	ख
३				×			
		ध		री			
रीरीसानि	सारींगरी	गमंमं	,गमं	ग	री	गरी	सा
जाऽऽऽ	गेऽऽऽ	बाऽऽ	,ऽऽ	बू	ऽ	ऽऽ	का।
२				०			
		नि	सा				
सानि	री	धसा	,निरी				
ऽऽ	ऽ	मौंऽ	,दर				
३							

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंतरा.

		सा					
निधमं	गगरी	निरीनिध	मंधसासा	सासासानि	सासासा	री	सा
निजठि	गबैठ	तोऽमैंसे	वाऽकरो	बावुसऽ	दारंग	घ	र
		ध		री			
रीरीसानि	सारीगरी	गमंमं	,गमं	ग	री	गरी	सा
काऽऽऽ	जूऽऽऽ	बाऽऽ	,ऽऽ	चू	ऽ	ऽऽ	का
सा		री	सा				
नि	री	धसा	,निरी				
ऽ	ऽ	मौंऽ	,दर				

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग पूर्वकल्याण

हा राग मारवा थाटांतून उत्पन्न होतो. हा संपूर्ण आहे. यांत वादी ऋषभ व संवादी धैवत आहे. अवरोहांत पंचम दुर्बल आहे. गाण्याचा वेळ संध्याकाळ आहे.

याचें साधारण स्वरूप असें आहे.

रेग, मंपधनि, धप, रे, मंपधमं, ग, रेसा। निरेनिध, निरे गमंप, मं, धमं, निनिधमंगरेसा। ग, मंधमंसां सांरेंसां, निरेंनिधनिधप, गमंपधनिसां, मंधमंग, निनिधमंगरेसा।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पूर्वकल्याण—एकताल (विलंबित)

स्थायी.

रीगमंपधनि	,धप	री (प)	मंपधमं	ग	री	सा	सा	नि (सा)	री	नि	,ध
हो SSSSS	,वन	ला	गीSSS	सां	S	S	झ	चे	S	तो	,ज
३		४		×		०		२		०	
धनिरीग	मंप--	धग	प	मंधमं (ध)	,धनि	(प)	ध	मं	ग	निनिधमं (ग ध)	गरीसा–
रा SSS	SSSS	SS	S	मोSS,	मन	वा	S	S	S।	रेSSS	SSSS
३		४		×		०		२		०	

अंतरा.

(मं) गग		मं (ध)	धमंध	सां (ध)	सांरीं	सां	निसां	नि (सां)	रीं	नि	ध
अब		तो	SSS	या	: दक	रो	SS	ला	S	म	ह
३		४		×		०		२		०	
नि (ध)	ध	प	,मंप	गमंपध	निसां--	मं	ध	मं	ग	निनिधमं (ग ध)	गरीसा–
री	S	को	,SS	ध्याSSS	SSSS	S	S	न	ध	रेSSS	SSSS
३		४		×		०		२		०	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग मालीगौरा

मगौ रिसौ निरी निपौ मगौ मधौ सनी रिगौ ।
रिसौ सायं भवेन्मालीगौरा ऋषभवादिनी ॥

अभिनवरागमंजर्याम् ॥ १२ ॥

गमधानि तीखे मृदु रिखब पंचमसुरहु लगाय ।
रिप बादी संबादितें मालीगौरा गाय ॥

रागचंद्रिकासार ॥ ५२ ॥

मालीगौरः परमरुचिरो मारुसंस्थानजन्यः
संपूर्णोऽसाविह किल रिधौ वादिसंवादिनौ स्तः
श्रीसंमिश्रो विलसति सदा पूरियामिश्रितश्च
सायंगीतो मधुरनिनदैर्मंद्रमध्यप्रचारः

रागकल्पद्रुमांकुरे ॥ ५१ ॥

मालीगौरा राग मारवा थाटांतून उत्पन्न होतो. हा संपूर्ण आहे. यांत वादी स्वर ऋषभ व संवादी पंचम आहे. सायंकाळीं गातात. यांत श्री व पूरिया या दोन रागांचा संयोग असतो. याचा विस्तार विशेषेंकरून मन्द्र व मध्य सप्तकांतच होतो. पूरियांत पंचम स्वर दाखल केला असतां मालीगौरा होतो असेंहि कित्येक जाणते लोक म्हणतात. यांत बहुधा दोन्ही धैवत गायक लोक लावितात. "सप" संगति या रागांत श्रीरागाचें अंग दर्शवितें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

"धनिसारेनिधप, मं, ग, मंधसा" इतके स्वर म्हटले म्हणजे मालीगौरा स्पष्ट होतो. हाहि एक अप्रसिद्ध रागांपैकींच आहे.

उठाव.

मंग, रेसा, नि, रेनि, प, मंग, मंध, सा, निरेग, रेसा ।

चलन.

नि ध ध
धनिसारेनिध, निधप, मंग, मंगमंध, सा, निरेसा, निरेग,
नि प ध रे ध
निरेसा, सा ऽ, प, मंधमंग, मंधमंग, ग, रेसा । मंध
रे
सां, सां, निरेंसां, निरेंनिध, मंनिधमंग, गरेसा,
रे
साध, मंग, ग, रेसा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मालीगौरा—त्रिताल (मध्यलय)

स्थायी.

			[सा]म [प]म:
			क र
ग - री सा	ऩि ध़ ऩि रीऩि	(प़) - - म़ग़	म़ ग़ - ग़
या ऽ द प्र	भू ऽ को ऽऽ	आ ऽ ऽ ऽऽ	ऽ ऽ ऽ ज
०	३	×	२
[म]ग़ ग़ ग़ ग़	[ध़]म़ - ध़ म़	सा सा - सा	[ग]ऩि री सा सा
अ व भ य	भं ऽ ज न	अ ल ऽ खिन	रं ऽ ज न
०	३	×	२
[री]ऩि - ऩि ऩि	ऩि री ग -	गप मंप ग री	सा - - सा
पू ऽ र त	म न की ऽ	काऽ ऽऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ज।
०	३	×	२

अंतरा.

[म]ग - ग [ध]मं	- मं ध मं	सां - सां सां	[नि]सां रीं सां सां
ए ऽ क भा	ऽ व ध र	नि ऽ मं ल	अं ऽ त र
०	३	×	२
सां - सां सां	सां निरीं नि नि	(प) - - मंग	मं - ग ग
छां ऽ ड त	सु बऽ अ भि	मा ऽ ऽ ऽऽ	ऽ ऽ ऽ न
०	३	×	२
सां - नि [ध]मं	- ध मं ग	ग - मं ग	री री सा सा
भू ऽ क्ति मू	ऽ क्ति के ऽ	दा ऽ य क	प्र भु व र
०	३	×	२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धृ	-	नि़	नि़	नि़	री	ग	-	गप	मंप	ग	री	सा	-	-	सा
रा	ऽ	ख	त	सु	ब	की	ऽ	लाऽ	ऽऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ज
०				३				×				२			

मालीगौरा—त्रिताल (मध्यलय)

स्थायी.

सा नि़
मे

धृ	नि़	री	सा	(धृ)नि़	-	धृ	पृ	मं़	प़	प़	मं़	मं़	ग़	-	(धृ)मं़
रे	म	ऽ	न	ला	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ग	ऽ	र	ही	ऽ	सु
३				×				२				०			
धृ	नि़	-	सा	री	-	-	-	(री)ग	-	नि़	-	री	सा	-	सा
र	त	ऽ	पि	या	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	की	ऽ	को
३				×				२				०			
-	नि़	-	री	ग	-	(मं)मं	ध	मं	ग	-	मं	ग	री	सा	(सा)नि़
ऽ	लों	ऽ	स	हु	ऽ	ऽ	क	हो	ए	ऽ	ति	पी	ऽ	र।	मे
३				×				२				०			

अंतरा.

नि़ सा
उ

सा	प	-	प	प	-	-	प	(म)प	-	पमं	ध	प	-	-	(मं)प
ठ	च	ऽ	ल	रे	ऽ	ऽ	तुं	सौं	ऽ	गऽ	मै	का	ऽ	ऽ	पि
३				×				२				०			

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

			नि
ध मं - ग	मं - री -	ग - री री	सा - - सा
या को ऽ मि	ला ऽ ऽ ऽ	ऽ ऽ व न	को ऽ ऽ प
३	×	२	०
नि	ध	प	ध
ध नि री नि	नि - ध प	मं ध नि सा	री सा - मं
ल प ऽ ल	ला ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ग त	जु ग ऽ अ
३	×	२	०
मं	ग		नि
ध मं - ग	मं - ग -	री री मं ग	री - सा ,सा
ब ना ऽ र	हे ऽ ऽ ऽ	ऽ ऽ मै का	धी ऽ र । मे
३	×	२	०

मालीगौरा—तीव्रा (मध्यलय)

स्थायी.

ध नि	सा री	री नि ध	प प	प प	पमं ध -
ए ऽ	र स	रा ऽ ऽ	स र	सु र	सो ऽ ऽ
२	३	×	२	३	×
प		सा			
ध -	सां	नि रे -	सा -	सा सा	ध नि -
रे ऽ	,बि	सौ ऽ ऽ	रे ऽ	तुं व	कि यो ऽ
२	३	×	२	३	×
		सा			
सा -	सा सा	नि री -	सा -	सा सा	ध नि -
आ ऽ	द गु	सां ऽ ऽ	ई ऽ	पु न	कि पी ऽ
२	३	×	२	३	×
री ग	- मं	ग री सा	नि री	ग री	नि ध सा
क टा	ऽ ऽ	च्छे ऽ ऽ	हे ऽ	रे ऽ	ऽ ऽ ऽ
२	३	×	२	३	×

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंतरा.

सा -	प -	प प -	प प	प प	प मं ध (प)
ना ऽ	नों ऽ	प्र का ऽ	र न	र स	भ रो ऽ
२	३	×	२	३	×
नि ध	मं ग	ध मं ग	री -	सा सां	री सा -
ऽ ऽ	ऽ ऽ	तूं ऽ ऽ	है ऽ	र स	क सी ऽ
२	३	×	२	३	×
नि री	ग मं	ध मं ग	री सा	नि री	ग री सा
ऽ ऽ	र स	ते ऽ ऽ	ऽ ऽ	ऽ ऽ	रे ऽ ऽ।
२	३	×	२	३	×

मालीगौरा—एकताल (विलंबित)

स्थायी.

					(नि) सा
					ते
(री) नि रीरीध	(ग) नि रीरीसानिसा	(ध) नि ध	प -	(ध) मं ध	सासानिध नि
रा ऽचो	लू ऽऽऽऽऽ	रा ऽ	ऽ ऽ	ऽ ऽ	ऽऽऽऽ ऽ
३	४	×	०	२	०
(ध) मंध (ध) मं	(ग) मं ग	(ग) सा सानि	री सा	(सा) निरी ग	(ग) निरी सा
दुऽ ल	रा ऽ	रा ऽऽ	ऽ ता	पल गा	ऽऽ ऽ
३	४	×	०	२	०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नि़ सा (सा)नि़	-री	ग	ध मं	धग	मं ग,-मं	री ग	-	री	सा,सा
रा ३	ऽऽ	ऽत ४	री	ब ×	ऽऽ	ऽ ० न,ऽऽ	रा २	ऽ	ऽ ०	ऽ।,ते

अंतरा.

नि़ सा	-	सा प	-मंप	मं प	-मं	ध	प	मं प	-	ध	-प
रा ३	ऽ	ता ४	,ऽऽ	मौं ×	ऽऽ	ग ०	ल	चा २	ऽ	ल ०	ऽसु
मं प	धधपमंप	मं	ग	ग मंमंरी	ग	ध मं,-ध	मं,गमं	री ग	नि़	री	सा
ना ३	ऽऽऽऽ	व ४	त	घऽऽ	री	घ,ऽऽ ०	री,ऽऽ	प २	ल	प ०	ल
नि़ नि़ सा सा(सा)		-नि़ध़	नि़ध़	नि़ सा	नि़री	गरी	सा	सा नि़रीगमं	धनिरींगं	रींनिधमं	गरीसासा
स ३	दाऽ	ऽरंऽ ४	गऽ	मौं ×	ऽऽ	ऽम ०	द	साऽऽऽ २	ऽऽऽऽ	ऽऽऽऽ ०	ऽऽऽऽते

मालीगौरा—एकताल (विलंबित)

स्थायी.

नि़ सासा
अहि

-	नि़ध़	नि़	नि़ सा रीरी,नि़	ध नि़	-	ध़	प़	प़ सा	सानि़	री	सा
ऽ ३	योऽ	ऽ ४	ऽऽ,मु	ने ×	ऽ	ऽ ०	ऽ	पी २	ऽऽ	ऽ ०	र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

सा				री			सा				
नि़	री	ग	,मं	ग	-	-	नि़	री	-	सा	निसा
:चे	ऽ	री	,ते	हा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	री	ऽऽ
३		४		×		०		२		०	
नि़	सा			सा							
सा	रीध़	सा	सा	नि़	री	ग	री	ग	री	सा	,सासा
अ	बऽ	मों	को	दी	ऽ	जे	फ	लू	नि	त ।	आहि
३		४		×		०		२		०	

अंतरा.

नि़			सा				मं				मं
सा	सा	-	प	प	प	प	प	पमं	ध़	प	,प
सा	हे	ऽ	अ	स	र	फ़	बा	ऽऽ	हु	ली	,क
३		४		×		०		२		०	
मं		ध़		री				नि़			सा
पमं	ध़	मं	गमं	ग	-	री	सा	सा	नि़	ध़	नि़
लौंऽ	ऽ	दू	रऽ	दी	ऽ	जे	ऽ	सु	ख	ऽ	सौं
३		४		×		०		२		०	
				ध़		सा			री		
री	नि़	ध़	प़	मं़	ध़	नि़	री	ग	नि़	री	सा
ऽ	प	त	ऽ	सु	न	ली	ऽ	जे	पी	ऽ	र
३		४		×		०		२		०	
सा				मं			री	री			
नि़	री	ग	-मं	ध	मं	ग,गमं	ग	नि़	री	सा	,सासा
औं	ली	या	ऽऽ	अ	ज	ऽ,ऽऽ	मे	ऽ	ऽ	री ।	आहि
३		४		×		०		२			

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri
Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

मालीगौरा—चौताल (विलंबित)

स्थायी.

											ध
											सा
											रा
	री	नि		ध			ध				नि
-	सा	निध	रीनि	नि	ध	प	म	-	ग	-	सा
ऽ	जा	ऽऽ	सिरि	रा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	म	ऽ	रा
३		४		×		०		२		०	
				री			री				ध
-	नि	-	री	ग	-	-	नि	री	सा	-,	सा
ऽ	ऽ	ऽ	म	चौं	ऽ	ऽ	ऽ	ऽ	द्र	ऽ।	रा
३		४		×		०		२		०	

अंतरा.

नि		सा					मं	ध			
सा	री	सा	प	-	प	प	प	प	मं	-	ग
प	ती	त	पा	ऽ	व	न	दी	न	बौं	ऽ	धु
×		०		२		०		३		४	
		मं					ध		ध		ग
-	ग	मं	री	ग	-	-	मं	ध	मं	मंग	मं
ऽ	से	व	क	को	ऽ	ऽ	दी	ऽ	जे	ऽऽ	आ
×		०		२		०		३		४	
री			री				ध
ग	-	-	नि	री	सा	-,	सा
नौं	ऽ	ऽ	ऽ	ऽ	द	ऽ।	रा
×		०		२		०	

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मालीगौरा—धमार (विलंबित)

स्थायी.

नि				री							ध		
ध	नि	सा	री	नि	-	ध	नि	ध	प	प	मं	-	ग
री	ऽ	ढ	प	बा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ज	न	ला	ऽ	ऽ
३				×					२		०		
ग				ध	ध								
मं	-	ग	-	मंध	सा	-	-	नि	री	-	ग	-	-
गे	ऽ	ऽ	ऽ	सऽ	ब	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	बा	ऽ	ऽ
३				×					२		०		
री				नि			सा				ध		
नि	री	सा	-	सा	-	-	प	-	-	प	मं	-	ध
ऽ	ऽ	जे	ऽ	चौं	ऽ	ऽ	ग	ऽ	ऽ	त्रि	दौं	ऽ	ग
३				×					२		०		
ध				ध	ध		ध						
मं	-	ग	-	मं	मं	ध	मं	ग	मं	री	ग	री,	सा
झां	ऽ	ऽ	ऽ	झ	न	ऽ	का	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ।	री
३				×					२		०		

अंतरा.

ध													
मं	ध	-	सां	सां	सां	-	सां	सां	-	नि	रीं	सां	-
उ	ड	ऽ	त	गु	ला	ऽ	ल	ला	ऽ	ल	भ	ये	ऽ
×					२		०			३			
सां					ध					री			
नि	-	रीं	नि	ध	मं	नि	ध	मं	ग	ग	री	सा	-
बा	ऽ	ऽ	द	र	ब	र	ख	त	ऽ	रौं	ऽ	ग	ऽ
×					२		०			३			
नि													
ध	नि	ध	मं	ग	मं	री	ग	री	सा				
छा	ऽ	ऽ	ये	ऽ	पि	च	का	ऽ	री				
×					२		०						

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग जैत किंवा जेत.

जैतरागो मारुमेले कथितः पंचमांशकः ।
संवादिषड्ज आरोहेऽवरोहे च विवर्जितौ ॥ २४४ ॥

निषादमध्यमावत्र तथा चौडुव एव च ।
गांधारधैवतौ तीव्रावृषभः कोमलो मतः ॥ २४५ ॥

केषांचिन्मत आदिष्टो जैत्रः कल्याणमेलजः ।
पूर्वरात्रे स गेयः स्यादयं सायं प्रगीयते ॥ २४६ ॥

संगीतसुधाकरे ॥ पृ. ३५ ॥

सगौ पगौ रिसौ गश्च पगौ रिगौ मधौ मगौ ।
रिसौ जैत्रो भवेत् पांशः पधगस्थायमंडितः ॥

अभिनवरागमंजर्याम् ॥ ११९ ॥

जब मारूके मेलमें मनि सुरको तजि देत ।
पस बादी संवादितें राग होत है जैत ॥

रागचंद्रिकासार ॥ ५४ ॥

जैत या रागाचीं दोन तीन स्वरूपें प्रचारांत आहे. एक औडुव–औडुव, ज्यांत मध्यम व निषाद मुळींच वर्ज्य आहेत. दुसरें ज्यांत तीव्र मध्यम किंचित् घेतला जातो, व तिसरें ज्यांत दोन्ही ऋषभ व दोन्ही धैवत येतात. हे सर्व प्रकार मारवा थाटांतच मानावे लागतील कारण त्यांची मांडणी त्याच थाटांतली आहे. जेतांत वादीस्वर पंचम व संवादी षड्ज आहे. गाण्याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेळ सायंकाळ आहे. जेतांत " पधग " हा स्वरविन्यास रागवाचक आहे. तसेंच ' साग ' व ' साप ' या स्वरसंगतीही महत्त्वाच्या आहेत. जेत-कल्याण नांवाचा पूर्वी वर्णिलेला राग जेतपासून वेगळा आहे. कारण तो कल्याण थाटांतला राग आहे.

उठाव.

सा, रे॒सा, रे॒ग, रे॒गप, प, पधग, रे॒गप, ग, रे॒सा ।

चलन.

सा, सा, रे॒गरे॒सा, रे॒रे॒सा, रे॒ग, प, प, धग, पधग, रे॒ग, धपग, रे॒, सा, सारे॒सा ।

प, प, सां, सां, सांरे॒ंसां, सांसां, रे॒ंसां, प, पग, रे॒गप, सां, पधग, सागप, धपग, गरे॒सा, सारे॒सा ।

मध्यम घेणारा जेत प्रकारः—

उठाव.

सा, गप, ग, री॒सा, ग, पग, री॒ग, मंधमंग, री॒सा ।

चलन.

रे॒गरे॒रे॒सा, गपप, पगप, पधग, रे॒ग, मंधमं, ग, रे॒सा ।

पपसां, सां, सांरे॒ंसां, सांसांरे॒ंसां, पपग, सासागप, पसां, पधग, रे॒गमंधमंग, रे॒सा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोन्ही ऋषभ व दोन्ही धैवत घेणारा जेत प्रकार.

चलन.

प   नि़ मं   रे   नि़

गपग, साग, पमं, धपग, पमंग, गसा, रेसा, सा, रेसा,

ध   रे   सा

प़ध़प़ । गपसां, सां, सांरेंसां, (प)ग, ग, रेसा, पगप

नि़   रे

मंध, प, पग, साग, पमंधप, ग, गरेसा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जेत—तिलवाडा (विलंबित)

स्थायी.

नि़ मं	मं प	ग	ग
सा ग प पग	सा ग प मंप	प पमं ध॒ प	प (प) - ग
मो ऽ ऽ रेऽ	रा ऽ ऽ ऽऽ	जा ऽऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ
३	×	२	०
री॒	सा	नि़	ध़
ग री॒ - सा	री॒ सा - नि़सा	सा (सा) - सानि़	प़ ध़॒ प़ -
आ नौं ऽ द	क रो ऽ ऽऽ	नि स ऽ दिऽ	न ऽ ऽ ऽ
३	×	२	०

(अथवा)

नि़	मं
सा सानि़ री॒ सा	प़ ध़॒ प़ -
नि ऽऽ ऽ स	दी ऽ न ऽ
२	०

अंतरा.

प	नि	नि	ग
गप सांसां, सांसां सांसां	सां रीं सां सां	सां (सां) (प) ग	प ग री॒ सा
अने कभा, तन रंग	तु मी स न	उ प जो ऽ	ऽ ऽ ऽ ऽ
३	×	२	०
री॒ सा	मं मं	नि़ मं	ग
सासा प पमं ध॒प	प प(प) प ग	सा ग प ग	पमं ध॒ प -ग
बहु भा ऽऽ तन	ब नेऽ गो ऽ	का ऽ ऽ ऽ	ऽऽ ऽ जा ऽऽ
३	×	२	०
री॒			
ग री॒ - सा			
आ नौं ऽ द			
३			

स्थायी प्रमाणें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्थायी (दुसरा प्रकार)

नि॒	मं			नि	प			ग				मं			
सा	ग	प	ग	सा	ग	प	ग	प	पमं	ध॒	प	प	–	ग	–
मो	ऽ	ऽ	रे	रा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽऽ	ऽ	ऽ	जा	ऽ	ऽ	ऽ
३				×				२				०			
रि॒								नि॒				ध॒			
ग	रि॒	–	सा	रि॒	सा	–	नि॒सा	सा	नि	रि॒	सा	प़	ध़	प़	–
आ	मौं	ऽ	द्	क	रो	ऽ	ऽऽ	नि	ऽ	स	ऽ	दि	ऽ	न	ऽ
३				×				२				०			

अंतरा (दुसरा प्रकार)

सं				नि				नि		मं		ग			
पप	सांसां	सांसां	सांसां	सां	रीं	सां	सां	सां	सां	प	ग	प	ग	रि॒	सा
अने	कभा	तन	रंग	तु	मी	स	न	उ	प	जो	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ
३				×				२				०			
नि॒	सा			मं				नि॒	प			ग			
सासा	प	पग	पप	प	ध॒	प	पग	सा	ग	प	ग	प	ध॒	प	पग
बहु	भा	ऽऽ	तन	ब	ने	गो	ऽऽ	का	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	जा	ऽऽ
३				×				२				०			
सा															
ग	रि॒	–	सा												
आ	नौं	ऽ	द्												
३															

स्थायी प्रमाणें.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जेत–झपताल (मध्यलय)

स्थायी.

									नि़ सा
									क
सा	ग	रि॒	–	सा	सा	–	ग	प	म॑
ल॒	स	ज्यो	ऽ	त	ला	ऽ	गी	ऽ	र
०		३			×		२		
प	–	ग	रि॒	सा	सा	–	ग	प	प
हे	ऽ	ज्यो	ऽ	त	ला	ऽ	गी	ऽ	र
०		३			×		२		
प	–	प	–	प	म॑ प	–	ध	ग	–
हे	ऽ	ख्वा	ऽ	जे	मो	ऽ	न	दी	ऽ
०		३			×		२		
म॑ रि॒	ग	ध॒ म॑	ध॒	म॑	ग	रि॒	सा	–	नि़ सा
म	ऽ	द	ऽ	र	बा	ऽ	रे	ऽ,	क
०		३			×		२		

अंतरा.

म॑ प	–	सां	–	सां	सां	सां	सां	–	–
धौ	ऽ	ल	ऽ	घू	म	ट	के	ऽ	ऽ
×		२			०		३		
सां नि सां	सां	सां	–	रीं	नि सां	–	प	–	ग
ब	ल	ब	ऽ	ल	जै	ऽ	ये	ऽ	ऽ
×		२			०		३		

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नि					प		ध		मं
सां	-	प	ग	प	सां	-	प	-	ध
जै	ऽ	ये	ऽ	ऽ	जू	ऽ	वा	ऽ	द
×		२			०		३		
		री		नि					
मं	ग	ग	रीसा	,सा					
र	स	के	ऽऽ	। क					
×		२							

(टीपः---कांहीं गवई ही चीज ' जेतश्री ' ची म्हणून गातात.)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग वराटी अथवा बरारी.

पधौ गपौ धमौ गरी गमौ गरी पुनश्च सः ।
गांधारवादिनी ख्याता वराटी भूरिरक्तिदा ॥ १२२ ॥
पूर्वीमेलगताप्यन्या वराटी श्रूयते क्वचित् ।
निरी गमौ मधौ ममौ गमौ धरी सरी निधौ ॥ १२३ ॥

अभिनवरागमंजर्याम् ॥

जब मारूके मेलमें पंचम दीन्ह लगाइ ।
धग संवादीवादितें तबहि बराटि कहाइ ॥

रागचंद्रिकासार ॥ ५३ ॥

वराटीति रागः स्मृतो मारुमेले ।
गवादी धसंवादियुक्तो विभाति ॥
सदा पंचमेनाभियुक्तः सुपूर्णः
स सायं बुधैर्गीयते मंजुगीतैः ॥

रागकल्पद्रुमांकुरे ॥ ५२ ॥

ग्रंथोक्त वराटीचेंच आधुनिक नांव 'बरारी' असें आहे. हा राग मारवा थाटांतून उत्पन्न होतो. हा संपूर्ण आहे. याचा वादीस्वर गांधार व संवादी धैवत आहे. हा सायंगेय आहे व मारव्याचे अंगानें गाइला जातो. पण पंचम स्वर लागत असल्यामुळें मारव्यापासून हा स्वतंत्र राखतां येतो. यांत "साप" व "गप" या स्वरसंगतींचा लाग आसतो. मध्यम यांत गौण ठेविणें इष्ट आहे. हा राग तोडी, त्रिवेणी व देशकार यांच्या संयोगानें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होतो असें जाणत्यांचें मत आहे. कोणी यांत कोमल धैवत घेऊन याला पूर्वी थाटांत मानितात. वराटीचे पुष्कळ प्रकार जुन्या ग्रंथांत वर्णिलेले आढळतात.

उठाव.

पधग, प, ध, मंग, री॒ग, मंग, री॒सा ।

चलन.

नि॒

गरे॒ग, रे॒सा, सा, रे॒सा, रे॒सा, साप, प, निधप, मंग, रे॒सा ।

पधप, सां सांरे॒ंसां, सांनिसांरे॒ंसां, मंधसां, सांरे॒ं, सां, निधप,

मंग, ग, रे॒सा ।

(अथवा)

रे॒

पधग, पधमंग, गरे॒, रे॒ग, धमंग, रे॒सा, सारे॒, रे॒ग, रे॒सा, सा,

सानि॒रे॒ग, पग, प, पध, सां, पधग ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बरारी—चौताल (विलंबित)

स्थायी.

(ध)मं
बि

(मं)री	ग	री	सा	सा	–	नि़	री	ग	–	री	(सा)नि़
र	S	हू	न	बा	S	S	व	री	S	S	बे
३				×		०		२		०	
री	सा	(नि़)सा	(सा)प	(मं)प	नि	ध	प	(ध)मं	ग	री	(ध)मं
S	ग	सु	ध	ले	S	S	हो	प्या	S	रे	, बि
३				×		०		२		०	

(अथवा)

ध	(मं)प	(ध)मं	ग	री	मं
हो	प्या	S	S	रे	, बि
०		२		०	

अंतरा.

(ध)मं	–	ध	सां	–	सां	सां	सां	–	सांनि	रीं	सां
का	S	S	हु	S	के	का	हु	S	नैंS	S	न
×		०		२		०		३		४	
(सां)नि	–	रीं	गं	रीं	सां	(सां)नि	–	रीं	नि	ध	प
बा	S	S	न	S	च	ला	S	S	व	त	S
×		०		२		०		३		४	
(ध)मं	–	ध	(ध)सां	–	सां	(सां)रीं	निध	नि	ध	प	–
पा	S	S	ती	S	न	आ	SS	S	S	ई	S
×		०		२		०		३		४	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

ध			री				ध
मं	-	ग	ग	-	री	सा,	मं
रा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	व	रे ।	वि
×		०		२		०	

बरारी—चैताल (विलंबित)

स्थायी.

सा				सा				नि़	सा		ध
नि़	री	ग	री	नि़	री	सा	-	सा	प	-	मं
सु	म	र	न	क	र	ले	ऽ	जि	या	ऽ	र
३		४		×		०		२		०	
		ध		ध		ध		री			
ध	नि	प	-	मं	ध	मं	ग	ग	री	सा	-
बा	ऽ	को	ऽ	ले	ऽ	ले	ऽ	ना	ऽ	म	ऽ
३		४		×		२		२		०	

अंतरा.

मं											
प	-	ध	प	सां	-	सां	-	रीं	सां	-	सां
मे	ऽ	री	क	ही	ऽ	मा	ऽ	न	ले	ऽ	रे
×		०		२		०		३		४	
नि						नि	रीं				
सां	नि	रीं	गं	रीं	सां	सां	नि	ध	प	ध	पग
छां	ऽ	ड	दे	ऽ	तूं	स	ब	ऽ	लो	ऽ	भऽ
×		०		२		०		३		४	
ध											
मं	ध	मं	गरी	ग	री	सा	-				
का	ऽ	ऽ	ऽऽ	ऽ	ऽ	म	ऽ				
×		०		२		०					

बरारी–चौताल (विलंबित)

स्थायी.

मं				मं			ध				मं
प	धग	-	पप	प	ध	मं	मं	ग	री	-	गमं
तूं	ऽऽ	ऽ	झक	झो	ऽ	ऽ	ऽ	र	ऽ	ऽ	झक
३		४		×		०		२		०	

				नि़				सा			
ग	री	सा	-	सा	-	सा	सा	नि़	री	ग	री
झो	ऽ	र	ऽ	आ	ऽ	न	ज	गा	ऽ	ई	प्या
३		४		×		०		२		०	

				नि़			सा				
ग	री	सा	-	सा	सा	-	नि़	-	री	ग	प
ऽ	ऽ	रे	ऽ	मु	ख	ऽ	प	ऽ	र	अं	च
३		४		×		०		२		०	

				मं		ध	सां				मं
ग	प	-	प	प	ध	सां	मं	ध	प	-	, प
र	डा	ऽ	र	सो	व	त	ना	ऽ	र	ऽ	। तूं
३		४		×		०		२		०	

ध	ग	-	पप
ऽ	ऽ	ऽ	झक
३		४	

अंतरा.

मं											
प	-	ध	सां	-	सां	सां	सां	-	सां	-	सां
अं	ऽ	ग	रा	ऽ	त	मु	स	ऽ	क्या	ऽ	त
×		०		२		०		३		४	

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नि								नि			
सां	सां	सां	रीं	–	सां	सां	सां	सां	रीं	सां	नि
उ	ठी	री	बा	ऽ	ल	ल	च	क	र	ही	ऽ
×		०		२		०		३		४	
मं					मं			मं			
प	–	प	प	प	प	ध	ग	प	धग	–	पप
बा	ऽ	र	न	के	भा	ऽ	र	तूं	ऽऽ	ऽ	झक
×		०		२		०		३		४	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग विभास.

(मारवामेलजन्य प्रकार)

निरी गमौ गरी सश्च गपौ गपौ धमौ गपौ ।
गरी सश्च विभासाख्यो धांशो रात्र्यंतयामके ॥

अभिनवरागमंजर्याम् ॥ १२७ ॥

विभासाचा हा दुसरा प्रकार मारवा थाटांतून उत्पन्न होणारा आहे. हा संपूर्ण आहे. यांत धैवत वादी व गांधार संवादी आहे. हा प्रातःकालीं गाइला जातो. 'गप' व 'मंध' या संगति यांत रक्तिदायक आहेत. पंचमावरचा मुक्काम या रागाचें गांभीर्य दर्शवितो. हा राग सावकाश गाइला असतां चांगला वठतो. यांत देशकार व गौरी यांचा संयोग आहे असें कांहीं लोकांचें मत आहे.

उठाव.

नि़, रे॒ग, मंग, रे॒सा, गप, गपध, मंग, पग, रे॒सा ।

चलन.

सा, नि़, रे॒ग, पग, रे॒सा, रे॒सा, नि़ध़, मंध़, सा, रे॒सा, (प)गप,

पध, पग, मंगरे॒सा । मंधसां, सां, रें॒सां, निरें॒गंरें॒सां,

सांनिध, मंधसां, सांरें॒निध, मंग, पग, रे॒सा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विभास–त्रिताल (मध्यलय)
(मारवामेलजन्य प्रकार)
स्थायी.

																सा
																र
					री											
नि॒	री॒	ग	प	ग	सा	री॒ध॒	ध॒	सा	सा	सा	री॒	सा	–	–	–	
बा	ऽ	ऽ	ऽ	को	ना	ऽऽ	म	सु	म	र	म	ना	ऽ	ऽ	ऽ	
०				३				×				२				
				ग				ग								
नि॒	री॒	ग	–	प	ग	प	–	प	–	ध	प	ग	री॒	सा,	सा	
झू	ऽ	ली	ऽ	ज	ग	की	ऽ	बा	ऽ	ऽ	स	ना	ऽ	ऽ।	र	
०				३				×				२				

अंतरा.

प	ग	प	प	ध	–	ध	ध	ध	नि	ध	निध	प	ध	प	–
ध्रु	व	पे	हे	ला	ऽ	द	अ	जा	ऽ	मि	ऽल	ता	ऽ	रे	ऽ
०				३				×				२			
नि		नि			सां			प							
ध	–	ध	सां	–	ध	–	प	ग	प	ध	प	ग	री॒	सा,	सा
पू	ऽ	जी	ऽ	ऽ	म	ऽ	न	का	ऽ	ऽ	म	ना	ऽ	ऽ।	र
०				३				×				२			

विभास–त्रिताल (मध्यलय)
(मारवामेलजन्य प्रकार)
स्थायी.

ग								मं				मं			
प	ग	प	प	प	–	–	–	प	–	ध	–	प	ध	प	ग
ह	रि	भ	ज़	रे	ऽ	ऽ	ऽ	तूं	ऽ	ऽ	ऽ	म	नु	जा	ऽ
३				×				२				०			

५–६

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

री	री	ग	प	ग	री	सा	सा	प	प	ग	ग	पप	गरी	सारी	निध
रि	ध	सि	ध	द्दा	ऽ	य	क	भ	व	भ	य	हाऽ	ऽऽ	ऽऽ	रक
३				×				२				०			
म	ध	म	सा	सा	–	री	सा	नि	री	ग	प	ग	री	सा	सा
भा	ऽ	व	ध	रे	ऽ	द्द	ढ	अ	प	ने	ऽ	भी	ऽ	त	र।
३				×				२				०			

अंतरा.

प	प	ग	ग	प	–	ध	–	ध	–	ध	म	ध	नि	प	प
ग	मं	न	सि	री	ऽ	के	ऽ	मे	ऽ	ल	न	स	मु	दि	त
३				×				२				०			
ध	–	सां	सां	(प)	–	प	प	प	ध	प	प	ग	री	सा	सा
गा	ऽ	य	बि	भा	ऽ	स	म	नी	ऽ	दु	र	ब	ल	क	र
३				×				२				०			
म	ध	म	सा	सा	–	सा	–	नि	री	ग	प	ग	री	सा	सा
धै	ऽ	व	त	बा	ऽ	दी	ऽ	अ	त	सूं	ऽ	दू	र	क	र।
३				×				२				०			

विभास—त्रिताल (मध्यलय)

(मारवामेलजन्य प्रकार)

स्थायी.

–	ग	–	प	ग	री	सा	–	सा	–	री	ध	सा	री	सा	–
ऽ	कां	ऽ	स्कुं	व	र	वा	ऽ	जा	ऽ	इ	ल	ह	म	रा	ऽ
०				३				×				२			

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

री	-	नि़	ध़	नि़	-	ध़	-	सा	-	ग	-	प	ग	प	-
ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	मो	ऽ	रे	-	द्र	र	वा	ऽ
०				३				×				२			
मं	ध					मं						ग	मं	ध	
नि	नि	ध	प	प	प	प	ध	प	ग	-	री	री	ग	मं	ध
ना	ऽ	य	न	घ	र	क	ल	वा	ऽ	ऽ	र	दे	ऽ	ऽ	ऽ।
०				३				×				२			
मं	ग	-	प												
ऽ	का	ऽ	स्कुं												
०															

अंतरा.

ग	-	ग	ग	प	मं	ध	ध	मं	सां	-	सां	सां	-	सां	-
औं	ऽ	म	द	सा	ऽ	तु	मी	स	दा	ऽ	रं	गी	ऽ	ले	ऽ
०				३				×				२			
				रीं				नि				ध		ध	
नि	-	रीं	गं	गं	रीं	सां	-	रीं	रीं	नि	ध	नि	ध	मं	-
प्रे	ऽ	ऽ	म्पी	या	ऽ	ला	ऽ	ना	ऽ	य	न	अ	प	ने	ऽ
०				३				×				२			
ध						मं		मं				ग	मं	ध	
मं	सां	सां	सां	मं	मं	ध	ध	ग	-	-	री	री	ग	मं	ध
ऊ	ऽ	प	र	सु	न	भ	र	वा	ऽ	ऽ	र	दे	ऽ	ऽ	ऽ।
०				३				×				२			
ग	ग	-	प												
ऽ	का	ऽ	स्कुं												
०															

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विभास—त्रिताल (मध्यलय)

(मारवामेलजन्य प्रकार)

स्थायी.

सा
सो

(सा)			
नि़ री ग प	ग सानि़ री ध़	सा सा सा री	सा - - -
अ ऽ ऽ ऽ	ब मोऽ ऽ रे	सु र ज न	वा ऽ ऽ ऽ
०	३	×	२
(सा)	(ग)		
नि़ री ग -	प ग प -	मं ध पग गप	ग री सा, सा
म्हा ऽ रे ऽ	ढिं ग तें ऽ	अ न तऽ नऽ	जा ऽ ऽ । सो
०	३	×	२

अंतरा.

(मं)	(प)		
प ग प -	प ध ध ध	ध नि ध नि	प ध प -
ब ल रै ऽ	न के स भें	म न रं ग	अ ब हीं ऽ
०	३	×	२
(सां सां सां)		(मं)	
ध ध ध सां	- (प) - प	प धग पध प	ग री सा, सा
ग र वा ऽ	ऽ ला ऽ ग	र हींऽ दुऽ र	ज न वा । सो
०	३	×	२

विभास—त्रिताल (मध्यलय)

(मारवामेलजन्य प्रकार)

स्थायी.

		(मं)	
प ग	प - - -	प - ध -	मं - ग -
ऽ ऽ मो रा	रे ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ
३	×	२	०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

ध | | सा री |
मं री ग मं | ग री सा - | प प ग ग | पग गप पग रीसा
मी ऽ त पि | य र वा ऽ | सु र ज न | वाऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
३ | × | २ | ०

| ध | | नि
सारी सानि ध - | मं ध मं सा | सा सा सा - | सा सा सा -
ऽऽ ऽऽ ऽ ऽ | बे ऽ ग द | र स वा ऽ | ब ल मा ऽ
३ | × | २ | ०

नि | सा | मं |
सा री सा - | नि री ग मं | री - ग - | री - सा -
मै ऽ का ऽ | आ ऽ न दि | खा ऽ ऽ ऽ | वो ऽ ऽ ऽ ।
३ | × | २ | ०

नि सा प ग |
ऽ ऽ मो रा |
३

अंतरा.

| मं | |
प प ग | प - ध ध | ध ध - ध | ध मं ध -
ऽ मं म द | सा ऽ क इ | स दा ऽ रं | गि ल रे ऽ
२ | ० | ३ | ×

ध | | |
नि नि ध नि | प ध प - | पप धध पप गरी | गप पग रीसा निसा
ब र स भ | इ ल वा ऽ | ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ | ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
२ | ० | ३ | ×

प ध प सा | सा सा सा सा | सा सा सा सा | सा री सा -
इ त नि बि | न त को इ | ह म रे मि | ल न की ऽ
२ | ० | ३ | ×

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सा				मं							
नि़	री	ग	मं	री	-	ग	-	री	सा,	प	ग
जा	ऽ	य	सु	ना	ऽ	ऽ	ऽ	वो	ऽ।	मो	रा
२				०				३			

विभास—आडाचौताल (विलंवित)

(मारवामेलजन्य प्रकार)

स्थायी.

(सा)
मैं

				ग						नि़			
नि़	री	ग	-	प	ग	-	री	सा	-	सा	(सा)	-	ध़
ऽ	तो	हे	ऽ	ऽ	धा	ऽ	ऽ	ऊं	ऽ	अ	ब	ऽ	ऽ
४		०		×		२		०		३		०	
ध़		सा		सा			ग				प		
सा	-	ध़	सा	री	ग	-	प	-	ग़	-	ग	प	-
पी	ऽ	रे	ऽ	ज	ला	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	लु	द्दी	ऽ
४		०		×		२		०		३		०	
				ध					ग				
-	प	ध	-	मं	ध	मं	ग	-	प	ग	री	सा,	(सा)
ऽ	न	ऽ	ऽ	है	ऽ	ऽ	ऽ	ऽ	द	र	ऽ	ऽ।	मैं
४		०		×		२		०		३		०	

अंतरा.

मं				नि				सां			सां		
प	ध	सां	-	सां	-	रीं	सां	नि	-	नि	रीं	गं	पं
सु	र	की	ऽ	सौं	ऽ	ग	त	रा	ऽ	ग	को	ऽ	ऽ
४		०		×		२		०		३		०	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

				ध	ध		ध			ध			ध
गं	<u>रीं</u>	सां	ध	मं	मं	ध	मं	-	ग	मं	ध	-	मं
म	र	म	ऽ	म	न	ऽ	ई	ऽ	ऽ	च्छा	ऽ	ऽ	फ
४		०		×		२		०		३		०	

				ध					ग				
ध	सां	-	निसां	मं	ध	मं	ग	-	प	ग	<u>री</u>	सा,	(सा)
ल	ऽ	ऽ	ऽऽ	पा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऊं	ऽ	ऽ।	मैं
४		०		×		२		०		३		०	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग पंचम.

मधौ सनी धमौ धश्च मगौ मगौ रिसौ समौ ।
गमौ धनी धनी मधौ मांशः पंचम कस्त्वपः ॥ १२४ ॥

अपि च

गरी सनी रिगौ मपौ मधौ मगौ मगौ रिसौ ।
संपूर्णः पंचमोऽन्यः स्यात् मध्यमांशो निशीथगः ॥ १२५ ॥

अभिनवरागमंजर्याम्

रागः पंचम एष सर्वविदितो युक्तो वसंतस्वरैः ।
वादी मध्यम एव यत्र विलसत् संवादि षड्जो मतः ॥
आयेहे ऋषभं न संस्पृशति यो वर्ज्यर्षभोऽपि क्वचित् ।
रात्रावंतिमयामके सुमतिभिर्मंजुस्वरं गीयते ॥

रागकल्पद्रुमांकुरे ॥ ११६ ॥

सब वसंतके सुर जहां चढत रिखब नहिं लाग ।
सम संबादीवादितें कहियत पंचम राग ॥

रागचंद्रिकासार ॥ ११६ ॥

पंचम राग मारवा थाटांतून उत्पन्न होतो. ह्याचे दोन प्रकार प्रचारांत आहेत. एक पंचम वर्जित (षाडव) व दुसरा संपूर्ण, हे दोन्ही प्रकार ललितांगाचे आहेत. अर्थात् दोन्ही मध्यमांचा प्रयोग दोहोंतहि संमत आहे. ह्या दोन्ही प्रकारांत वादीस्वर शुद्ध मध्यमच आहे व षड्ज संवादी आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोन्ही उत्तर राग असून ते उत्तर रात्रींत गातात. षाडव प्रकारांत हिंदोलांग असतें. कोणी ह्या प्रकारांत ऋषभाचें दुर्बलत्व मानितात.

हा राग जुन्या ग्रंथांत वर्णिलेला आढळतो. पण तेथें तो भैरव थाटांत सांगितलेला आहे.

षाडव प्रकार

उठाव.

म॑ध, सां, नि़ध, म॑ध, म॑ग, रे॒सा, साम, ग, म॑ध, निध, निम॑ध।

चलन.

म॑धसां, सां, सांनिध, म॑धम॑ग, म॑गरे॒सा, नि़साम, म, मग, म॑धसां, निधनिम॑ध ।

संपूर्ण प्रकार

उठाव.

ग, रे॒सा, नि़रे॒ग, म, प, म॑ध, म॑ग, रे॒सा ।

चलन.

ग, म॑ग, रे॒सा, म, म, मग, प, म॑धमम, मग, म॑धसां, सां,

रे॒ंसां, रे॒ंनिध, म॑धम॑गग, रे॒ग, म॑गरे॒सा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंचम—झपताल (मध्यलय)

(प-वर्ज्य प्रकार)

स्थायी.

(ध)मं	ध	सां	सां	सां	सां	–	सां	ध	ध
मा	ऽ	रु	व	स	मा	ऽ	ख्या	ऽ	त
×		२			०		३		
(ध)मं	ध	मं	ग	मं	ग	–	सा	–	सा
मे	ऽ	ल	न	स	मू	ऽ	त्प	ऽ	न
×		२			०		३		
(ऩि)सा	–	(सा)म	म	म	म	–	(म)ग	ग	ग
पौं	ऽ	च	म	गु	नी	ऽ	प्रि	य	क
×		२			०		३		
(ध)मं	ध	(ध)सां	–	सां	(सां)नि	ध	नि	मं	ध
ह	त	रा	ऽ	ग	जा	ऽ	यो	ऽ	ऽ।
×		२			०		३		

अंतरा.

(ध)मं	ध	सां	–	सां	सां	सां	सां	–	सां
हिं	ऽ	दो	ऽ	ल	रि	प	ही	ऽ	न
×		२			०		३		
(नि)सां	–	(मं)गं	गं	मं	गं	मं	गं	–	सां
सो	ऽ	ह	नि	सु	ध	म	दी	ऽ	न
×		२			०		३		

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

^सां^ मं	मं	^मं^ गं	-	मं	गं	गं	सां	-	सां
ल	लि	तां	ऽ	ग	म	बि	ची	ऽ	त्र
×		२			०		३		
^ध^ मं	ध	सां	-	सां	सां	ध	नि	मं	ध
स	ब	को	ऽ	ब	चा	ऽ	यो	ऽ	ऽ।
×		२			०		३		

पंचम–सूलताल (मध्यलय)

स्थायी.

सा
प्र

री	री	सा	सा	सां	सां	-	सां	सां	सां
थ	म	गु	न	बि	चा	ऽ	र	कु	रि
३		०		×		०		२	
^रीं^ नि	ध	^ध^ मं	मं	ग	-	^ध^ मं	-	ध	सां
ये	ऽ	ध	री	ये	ऽ	का	ऽ	म	दो
३		०		×		०		२	
-	सां	रीं	रीं	नि	ध	मं	ग	री ,	सा
ऽ	ख	बि	चा	ऽ	ऽ	ऽ	ऽ	र ।	प्र
३		०		×		०		२	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंतरा.

मं	ध	सां	-	सां	-	सां	-	सां	-
गु	न	ते	ऽ	हीं	ऽ	ते	ऽ	हीं	ऽ
०		×		०		२		३	
सां	-	रीं	नि	ध	-	मं	-	नि	ध
रा	ऽ	खि	ये	ऽ	ऽ	ओ	-	क्त	जु
०		×		०		२		३	
मं	ग	मं	ध	सां	-	सां	सां	सां	रीं
ग	त	ति	न	हू	ऽ	को	ब	चा	ऽ
०		×		०		२		३	
नि	ध	मं	ग	री	-	सा,	सा		
ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	य ।	प्र		
०		×		०		२			

पंचम–सूलताल (मध्यलय)

स्थायी.

सां	-	सां	सां	ध	ध	मं	ध	प	-
रा	ऽ	म	ना	ऽ	म	ले	ऽ	ले	ऽ
×		०		२		३		०	
प	ग	प	मं	ध	-	नि	सां	सां	-
म	न	मे	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	रो	ऽ
×		०		२		३		०	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ग	म	ग	नि	ध	प	मं	प	ग	प
गु	प	त	प्र	ग	ट	र	ट	ना	ऽ
×		०		२		३		०	

ग	-	री	सा	नि़	सा	ग	री	सा	-
ध्या	ऽ	न	जो	क	रं	क	र	के	ऽ।
×		०		२		३		०	

अंतरा.

मं	मं	ध	ध	नि	सां	सां	सां	नि	सां
ध	डि	ध	डि	प	ल	प	ल	प	ह
×		०		२		३		०	

सां	नि	सां	सां	सां	सां	गं	-	सां	सां
र	प	ह	र	नि	स	बा	ऽ	स	र
×		०		२		३		०	

प	-	सां	-	सां	-	मं	-	ध	ऽ
ये	ऽ	सो	ऽ	ई	ऽ	च्छा	ऽ	आ	ऽ
×		०		२		३		०	

मं	मं	ग	ग	प	ग	प	ग	री	सा
नं	द	सु	ख	क	र	क	र	के	ऽ।
×		०		२		३		०	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंचम—चौताल (मध्यलय)

स्थायी.

	(सां)नि	रीं	नि	(ध)मं	-	ध	(सां)नि	रीं	नि	(ध)मं	-
ऽ	मा	ऽ	ध	वा	ऽ	ऽ	मा	ऽ	ध	वा	ऽ
३		४		×		०		२		०	
ग	(ध)मं	-	ध	रीं	सां	-	-	(ध)मं	मं	ग	ग
ऽ	मा	ऽ	ध	वा	ऽ	ऽ	ऽ	म	द	न	म
३		४		×		०		२		०	
ग	ग	(ध)मं	ध	सां	-	सां	सां	(सां)नि	रीं	नि	-
थ	न	म	धु	सू	ऽ	द	न	म	न	मो	ऽ
३		४		×		०		२		०	
(ध)मं	मं	ग	ग	मं	-	ग	ग	री	सा	-	सा
ह	न	म	द	ना	ऽ	न्त	क	मु	कूं	ऽ	द
३		४		×		०		२		०	
सा	सा	म	-	म	म	म	म	मं	ग	(ध)मं	ध
मु	र	ली	ऽ	ध	र	मु	स	ऽ	री	मा	ऽ
३		४		×		०		२		०	
सां	-	सां	निरीं	गं	-	रीं	सां	सां	सां	(सा)नि	मं
या	ऽ	प	तिऽ	भ	ऽ	क्त	व	त्स	ल	ह	रें।
३		४		×		०		२		०	
ध	(सां)नि	रीं	नि								
ऽ	मा	ऽ	ध								
३		४									

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंतरा.

नि											
सां	–	सां	सां	–	सां	सां	–	नि	रीं	सां	सां
दी	ऽ	न	बं	ऽ	धु	दा	ऽ	मो	ऽ	दु	र
×		०		२		०		३		४	
नि						सां			ध		
सां	नि	सां	रीं	सां	–	नि	रीं	नि	मं	–	ध
दु	नु	जा	ऽ	री	ऽ	दी	ऽ	ना	ना	ऽ	थ
×		०		२		०		३		४	
							ध		ग		
सां	–	सां	सां	नि	ध	नि	मं	–	मं	–	ग
दा	ऽ	लि	द्र	ह	र	द	या	ऽ	सिं	ऽ	धु
×		०		२		०		३		४	
ग	–	मं	ध	मं	ग	–	री	री	सा	सा	नि़
दी	ऽ	नो	–	द्धा	ऽ	ऽ	र	न	द	या	ऽ
×		०		२		०		३		४	
										सां	
री	म	म	म	म	–	म	मं	–	ग	नि	–
ऽ	नि	धि	द	या	ऽ	नि	धा	ऽ	न	ना	ऽ
×		०		२		०		३		४	
							ध		सां		
रीं	गं	रीं	सां	नि	रीं	नि	मं	ध	नि	रीं	नि
रा	ऽ	य	न	न	र	ह	र	ऽ	मा	ऽ	ध
×		०		२		०		३		४	
ध			सां			ध			ध		
मं	–	ध	नि	रीं	नि	मं	–,	ग ।	मं	–	ध
वा	ऽ	ऽ	मा	ऽ	ध	वा	ऽ	ऽ ।	मा	ऽ	ध
×		०		२		०		३		४	

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंचम—धमार (विलंबित)

स्थायी.

													ध
										ग	–	मं	ध
										गो	ऽ	कु	ल
										३			
			सां			नि							
सां	–	–	ध	सां	मं	ध	नि	ध	मं	ग	री	सा	–
गां	ऽ	ऽ	व	ऽ	के	ऽ	ब	सै	ऽ	या	ऽ	ऽ	ऽ
×					२		०			३			
					मं		सा						
सा	री	–	सा	–	ग	मं	ध	सां	–	सां	सां	रीं	सां
स	खी	ऽ	री	ऽ	मों	ऽ	ऽ	सों	ऽ	क	र	त	अ
×					२		०			३			
ध	सां												
मं	ध	–	सां	–	ध	मं	ग	री	सा				
ने	ऽ	ऽ	क	ऽ	ठ	कु	रा	ऽ	इ।				
×					२		०						

अंतरा.

मं	ध												
ग	मं	ध	सां	–	सां	सां	सां	–	–	सां	रीं	सां	–
मो	ऽ	ऽ	र	ऽ	मु	क	ट	ऽ	ऽ	मु	र	ली	ऽ
×					२		०			३			
सां	सां	सां	ध	ध	गं	–	सां	सां	सां	सां	रीं	सां	–
क	र	सो	ऽ	हे	बा	ऽ	कि	लं	ग	रा	ऽ	ई	ऽ
×					२		०			३			
ध													
मं	ध	सां	सां	–	ध	मं	ग	री	सा				
क	हूं	ऽ	ना	ऽ	जा	ऽ	ऽ	ऽ	इ।				
×					२		०						

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संचारी.

सा	म	-	म	-	ग	-	मं	ध	सां	ध	मं	ग	री
के	ऽ	ऽ	ष्ण	ऽ	ऽ	ऽ	र	सि	क	मां	ऽ	ग	त
×					२		०			३			
ग	मं	ध	सां	सां	रीं	नि	ध	मं	ग	नि	ध	मं	ग
गो	ऽ	ऽ	र	स	ऐ	ऽ	सो	ऽ	ऽ	ढी	ऽ	ट	ऽ
×					२		०			३			
	मं		सां										
री	ग	मं	ध	सां	सां	ध	नि	मं	ध	मं	ग	री	सा
कुं	व	ऽ	रे	ऽ	क	ऽ	न्हा	ऽ	ऽ	ई	ऽ	ऽ	ऽ।
×					२		०			३			

(अपूर्ण)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राग भटिहार.

(भटियार किंवा भटियारी).

सधौ पधौ मपौ गश्च मधौ सरी निधौ च पः।
मपौ गरी तथा सश्च भट्टियारस्तु मांशकः॥

अभिनवरागमंजर्याम् ॥ १२६ ॥

मेलाद्वासंतिकाद्वै प्रभवति रूचिरो भट्टिहारोऽपि रागः।
